www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-224 • Saturday, 20 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

अनमोल विचार

''जीवनातील समस्या पाहून कधीही निराश होऊ नका कारण तुमचा वेळ कमकुवत आहे,तुम्ही नाही.''

लक्षवेधी

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी सरकारद्वारे चांगल्या सोयी-सुविधा ! - विनीत सिंह, भाजप आमदार

अयोध्या : अयोध्या येथे संपूर्ण भारतातून मोठ्या प्रमाणात भाविक येत आहेत. त्यांच्यासाठी सर्व प्रकारच्या सुविधा मंदिर विश्वस्त आणि सरकार यांच्या वतीने करण्यात आल्या आहेत, अशी माहिती मिझार्पूर (उत्तरप्रदेश) येथील भाजपचे आमदार श्री. विनीत सिंह यांनी येथे दैनिक 'सनातन प्रभात'च्या विशेष प्रतिनिधीशी बोलतांना दिली. अयोध्या येथे प्रभु श्रीरामाचे दर्शन घेऊन झाल्यानंतर सिंह बोलत होते. ते पुढे म्हणाले की, अयोध्या नगरी त्रेतायुगात असल्याचे आज जाणवत आहे. येथे येर्णाया सर्व भाविकांसाठी रहाणे आणि खाणे-पिणे यांच्या सर्व चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ संत आहेत, तर आपले पंतप्रधान संन्यासी प्रवृत्तीचे आहेत.

'प्रभू श्रीरामांपेक्षा मोठे कोणीही नाही.'; शंकराचार्यांच्या भूमिकेला योगी आदित्यनाथ यांचे उत्तर

अयोध्या : अयोध्येमधील राम मंदिर उद्घाटन सोहळा अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने अयोध्यानगरी सजली आहे. यासाठी तब्बल 8 हजार पाहुण्यांना आमंत्रित केले असून आज प्रभू श्रीरामांच्या पहिल्या मूर्तीचे दर्शन देखील झाले आहे. या सोहळ्याची अनेक दिवसांपासून चर्चा सुरु असली तरी या उद्घाटनाला शंकराचार्यांनी विरोधी केल्याची चर्चा सर्वत्र रंगली. आता शंकराचार्यांच्या या नकारावर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. 'प्रभू श्रीरामांपेक्षा मोठे कोणीही नाही' असे देखील योगी आदित्यनाश म्हणाले आहेत.

चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकार नवे चित्रपट धोरण लागू करणार

पुणे : देशात अनेक चित्रपट महोत्सव होतात; मात्र पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासारखा चित्रपट महोत्सव एकमेव आहे. असे महोत्सव तरुणांसाठी प्रेरणादायी आहेत. राज्य सरकार चांगल्या पद्धतीचे चित्रपट धोरण बनवत असून त्याद्वारे चित्रपट क्षेत्राला प्रोत्साहन मिळण्यास साहाय्य होईल. हे धोरण लवकरच मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर केले जाणार आहे, अशी माहिती 'फिल्म सिटी'चे व्यवस्थापकीय संचालक अविनाश ढाकणे यांनी दिली. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन ढाकणे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. ढाकणे पुढे म्हणाले, ''पुणे केवळ सांस्कृतिक राजधानीच नव्हे, तर शैक्षणिक आणि 'आयटी हब'ही आहे.

बाबा राम रहिमला दोन महिन्यात दुसऱ्यांदा पॅरोल मंजूर

नवी दिल्ली : बलात्कार प्रकरणातील दोषी व हरयाणातील डेरा सच्चा सौदा प्रमुख बाबा राम रहिम सिंग याला गेल्या दोन महिन्यात दोनदा पॅरोल मंजूर करण्यात आला आहे. याआधी त्याला नोव्हेंबर महिन्यात 21 दिवसांचा पॅरोल मंजूर करण्यात आला होता. या वर्षीचा हा पहिला पॅरोल असून गेल्या वर्षी बाबा राम रहिम याला तीन वेळा पॅरोल मंजूर झाला होता. आपल्या दोन शिष्यांवर बलात्कार केल्याप्रकरणी रहीम सध्या हरयाणातील रोहतक जिल्ह्यातील सुनारिया तुरुंगात शिक्षा भोगत आहे. पंचकुला येथील विशेष सीबीआय न्यायालयाने त्याला शिक्षा सुनावली होती.

12000 जवान, 10000 CCTV आणि AI मॉनिटरिंग...अयोध्येत चोख सुरक्षा व्यवस्था

अयोध्या : उत्तर प्रदेश पोलिसांचे कायदा आणि सुव्यवस्थेचे महासंचालक प्रशांत कुमार यांनी मीडियाला सांगितले की, रामललाच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमापूर्वी सायबर धोक्याचा सामना करण्यासाठी गृह मंत्रालयाने एक उच्चस्तरीय सायबर तज्ञ टीम अयोध्येत पाठवली आहे. यासाठी नियंत्रण कक्षही स्थापन करण्यात आले आहेत, जिथे वेगवेगळ्या एजन्सी कथित धोक्यांवर रिअल-टाइम आधारावर लक्ष ठेवत आहेत. याशिवाय शहरातील कानाकोपऱ्यात सुरक्षा यंत्रणा तैनात असतील. पुढे प्रशांत कुमार म्हणाले, अयोध्या शहरात आणि आसपास सुमारे12000 जवान, 10,000 सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. त्यापैकी सुमारे 400 मंदिराभोवती आणि यलो झोनमध्ये आहेत.

ज्ञानवापी संकुलातील तळघराच्या चाव्या जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्याचा न्यायालयाचा आदेश !

वाराणसी: जिल्हा न्यायालयाने ज्ञानवापी संकुलातील तळघराच्या चाव्या जिल्हाधिकार्यांकडे सोपवण्याचा आदेश दिला आहे. हिंदु पक्षाचे अधिवक्ता मदन मोहन यादव यांनी सांगितले की, जिल्हा न्यायाधीश ए.के. विश्वेश यांनी त्यांच्या आदेशात म्हटले आहे की, ज्ञानवापी संकुलाच्या तळघराची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. हिंदु पक्षाचे अधिवक्ता मदन मोहन यादव यांनी यापूर्वी सांगितले होते की, सरकारी अधिकार्यांनी १९९३ मध्ये ज्ञानवापीच्या तळघराला कुलूप लावले होते. अधिवक्ता यादव यांनी त्यांच्या याचिकेत दावा केला होता की, याआधी पुजारी सोमनाथ व्यास या तळघराचा पूजेसाठी वापर करत होते.

बिल्किस बानो प्रकरणातील दोषींना 21 जानेवारीपर्यंत करावे लागणार आत्मसमर्पण

नवी दिल्ली : बिल्किस बानो प्रकरणातील सर्व दोषींना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दणका बसला आहे. त्यांच्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने आत्मसमर्पण करण्यासाठी आणखी वेळ देण्याची त्यांची मागणी फेटाळून लावली. या सर्व दोषींना आत्मसमर्पण करण्यासाठी आणखी वेळ देण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नकार दिला आहे. दोषींच्या या याचिकेत योग्यता नसल्याचे न्यायालयाने सुनावणीदरम्यान म्हटले आहे. ज्या दोषींनी न्यायालयाला ही विनंती केली आहे त्यात गोविंदभाई नाई, रमेश रुपाभाई चंदना आणि मितेश चिमणलाल भट यांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या याचिकेत गोविंदभाई नई यांनी आजारपणाचे कारण देत आत्मसमर्पणाची वेळ चार आठवड्यांनी वाढवण्याची मागणी केली आहे.

मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी मागासवर्गीय आयोगातर्फे होणार सर्वेक्षण

"मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी २३ ते ३१ जानेवारी या कालावधीत सर्वेक्षण केले जाणार आहे. संपूर्ण शहरात सर्वेक्षण करताना गरजेनुसार फेऱ्या वाढल्या जातील. तसेच जे प्रभाग अनुसूचित जाती जमातीसाठी आरक्षीत आहेत, तेथील काम लवकर पूर्ण होईल, तेथील मनुष्यबळ इतर भागात वापरले जाईल."
- रवींद्र बिनवडे, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.

■ठाणे। यश सावंत,

मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी मागासवर्गीय आयोगातर्फे मंगळवारपासून सर्वेक्षण सुरु करण्यात येणार आहे. त्यासाठी शनिवारी आणि रविवारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. ३१ जानेवारीपर्यंत हे सर्वेक्षण पूर्ण करायचे असल्याने शहरातील १२ लाख कुटुंबांपर्यंत पोहचण्याचे आव्हान महापालिकेच्या कर्मचाऱ्यांपुढे आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी गेल्या काही महिन्यांपासून आंदोलने सुरु आहेत. तर दुसरीकडे ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यापेक्षा मराठा समाजासाठी स्वतंत्र कोटा दिला जाईल, हे आरक्षण न्यायालयात टिकणारे असेल असे आश्वासन राज्य सरकारने दिले आहे. ते अद्याप आंदोलकांनी मान्य केलेले नसले तरी सरकारतर्फे त्या दृष्टीने तयारी सुरू झाली आहे.

सरकारने राज्य मागासवर्ग आयोगाला मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार राज्यात सर्वेक्षण केले जाणार आहे.सुमारे दोन आठवड्यापूर्वी यासाठी बैठक झाली, त्यानंतर महापालिकेने दोन टप्प्यात आदेश काढत २ हजार कर्मचाऱ्यांची सर्वेक्षणासाठी नियुक्ती केली आहे. गरज भासल्यास आणखी कर्मचाऱ्यांची सर्वेक्षणासाठी नियुक्ती केली जाईल. पुणे शहरातील १२ लाख कुटुंबापर्यंत पोहचून सर्वेक्षण केले जाणार आहे. २३ ते ३१ जानेवारी या कालावधीत सर्वेक्षण करताना प्रत्येक फेरीमध्ये कर्मचाऱ्यास १५० कुटुंबाचे सर्वेक्षण करावे लागणार आहे. यामध्ये मागसवर्गीय प्रवर्गातील नागरिकांचा समावेश नसेल. गरजेनुसार फेऱ्या वाढवून संपूर्ण शहरात सर्वेक्षण केले जाईल, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे दोन दिवस प्रशिक्षण चालणार आहे. प्रत्येक १५ कर्मचाऱ्यांमागे एक पर्यवेक्षक नियुक्त केले आहे. त्यांचे प्रशिक्षण पुणे महापालिकेत शनिवारी होणार आहे. तर अन्य कर्मचाऱ्यांचे सर्वेक्षण रविवारी (ता.२१) गणेश कला क्रीडा मंच येथे होणार आहे, असे बिनवडे यांनी सांगितले.

पाल येथील श्री खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त वाहतुकीत बदल, जिल्हा प्रशासनाचं नियोजन

■सातारा। भावना जैन,

पाल (ता. कराड) येथे श्री खंडोबा देवाची यात्रा दि. २० ते दि. २८ जानेवारी २०२४ या कालावधीत भरणार आहे. या यात्रेसाठी महाराष्ट्रातून तसेच शेजारील राज्यातून लाखोच्या संख्येने भाविक दर्शनासाठी खाजगी वाहने तसेच एसटी बसने येत असतात. त्या मुळे पाल व उंब्रज शहरात वाहतुकीची कोंडी होत असते. या अनुषंगाने पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पाल परिसरातील रस्त्यावरील वाहतुकीसंबंधीचे आदेश दि. २० ते दि. २८ जानेवारीपर्यंत जारी केले आहे. काशिळ ते पाल रस्त्यावर येणारी सर्व वाहने आदर्शनगर गावाजवळील तात्पुरते एसटी स्टॅन्डसमोर थांबवून समोरील शेतात पार्किंगची व्यवस्था केली आहे, तेथे वाहने पार्क करावीत. हरपळवाडी ते पालला येणारी सर्व वाहने ही इमरसन कंपनीजवळ थांबून तेथील शेतात वाहने पार्क करावीत. तारळे-पालला येणारी सर्व वाहने ही तारळे रस्त्याला पाल ग्रामपंचायतीच्या नर्सरीसमोर रस्त्यावर थांबवून तेथे पार्क करावीत. मरळी ते पाल येणारी सर्व वाहने ही खंडोबा कारखान्यासमोर श्रीकांत शेजवळ यांच्या शेताच्या समोर पार्कींगमध्ये पार्क करावीत. वडगाव ते पाल हा रस्ता आपत्तकालीन असून त्या रस्त्यावर येणाऱ्या सर्व वाहनांना व वाहने पार्किंग करण्यास बंदी आहे.

पावसाचे पाणी महामुंबई जमिनीत जिरवणार!

■मुंबई। दिगंबर जाधव,

मुंबई महानगर प्रदेशातील नद्यांचे संरक्षण, पूर प्रतिबंध, पावसाचे पाणी अडवणे आणि जमिनीत जिरवणे वासह हवामानाशी निगडीत आव्हानांवर मात करता येणार आहे. एमएमआरडीएला यासाठी हेलसिंकी, फिनलंड येथील रिव्हर रिसायकल ओवायचे सहकार्य लाभणार असून, नद्यांचे संरक्षण, पूर प्रतिबंध, पर्यावरण सुधारणा आणि हवामान बदल यासारख्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी यासंदर्भात करार करण्यात आला आहे.

समुद्रात टाकण्यात येणाऱ्या प्लॅस्टीकमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी रिव्हर रिसायकल ओवाय ही संस्था काम करते. करारामुळे या संस्थेच्या मार्गदर्शनाचा एमएमआर क्षेत्रामध्ये जलप्रदूषणाला आळा घालण्यासाठी फायदा होणार आहे. करारामुळे उभय पक्षांना फायदा होणार आहे. हवेची गुणवत्ता सुधारणे आणि एमएमआर क्षेत्र आणि आसपासच्या परिसरात पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्याची प्रक्रिया तयार करणे यासाठी एमएमआरडीएला मार्गदर्शन मिळणार आहे.

2000 च्या नोटांबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेचा नवा आदेश जारी

■मुंबई। सचिन कदम,

2000 च्या नोटांबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेचा नवा आदेश जारी केला आहे. सोमवार अर्थात 22 जानेवारी 2024 या दिवशी आयोध्या येथील राम मंदिराचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यानिमित्ताने बँकाना हाफ डे देण्यात आला आहे. यामुळे या दिवशी दोन हजार रुपयांच्या नोटा बँकेत जमा केल्या जाणार नाहीत किंवा बदली देखील केल्या जाणार नाहीत. रिझर्व्ह बँकेने या संदभार्तील सूचना पत्रक जारी केले आहे. 19 मे 2023 रोजी आरबीआयनं एक पत्रक काढत 2 हजार रुपयाच्या नोटा चलनातून काढून घेण्याची घोषणा केली होती. नोटा बदलण्यासाठी नागरिकांना 30 सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर 7 ऑक्टोबर 2023 पर्यंत मुदत वाढवण्यात आली. 2 हजार रुपयाच्या 97 टक्के नोटा परत आल्याचं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं यापूर्वी जाहिर केले आहे. 22 जानेवारीला राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलीय. राम मंदिर लोकार्पण सोहळ्या निमित्त राज्य सरकारनं हा निर्णय घेतलाय.

श्रीराम मंदिराचा ऐतिहासिक निर्णय देणाऱ्या न्यायमूर्तींना प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण

■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,

श्रीराम जन्मभुमी अयोध्येत रामललाच्या प्राणप्रिष्ठेची तयारी पूर्ण झाली आहे. तीन दिवसानंतर प्रभू राम आपल्या आसनावर विराजमान होतील. या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी हजारो मान्यवरांना निमंत्रणे पाठवण्यात आली आहेत.यामध्ये रामजन्मभूमी-बाबरी मशीद प्रकरणात ऐतिहासिक निकाल देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचाही समावेश आहे.पीटीआय वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, राम मंदबाबरी मशीद प्रकरणावर ऐतिहासिक निकाल देणाऱ्या पाच न्यायाधीशांव्यतिरिक्त, माजी सरन्यायाधीश, न्यायाधीश आणि प्रमुख वकीलांसह न्याय क्षेत्राशी संबंधित 50 हून अधिक व्यक्तींना 22 जानेवारीला होणाऱ्या सोहळ्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. 9 नोव्हेंबर 2019 रोजी तत्कालीन उखकरंजन गोगोई, माजी उखकएसए बोबडे, वर्तमान उखकडीवाय चंद्रचूड, माजी न्यायमूर्ती अशोक भूषण आणि न्यायमूर्ती एस अब्दुल नजीर यांचा समावेश असलेल्या पाच सदस्यीय खंडपीठाने राम मंदिराच्या बाजूने निर्णय दिला होता. तसेच, मुस्लिम पक्षकारांना पाच एकर पयार्यी जमीन देण्याचे आदेश सरकारला दिले होते.माजी उखकरंजन गोगोई हे सध्या राष्ट्रपतींनी नामनिर्देशित केलेले राज्यसभेचे खासदार आहेत. न्यायमूर्ती एसए बोबडे हे 18 नोव्हेंबर 2019 ते 23 एप्रिल 2021 पर्यंत भारताचे 47 वे सरन्यायाधीश होते.

पुण्यात २२ जानेवारीला मटण, चिकन विक्री बंद; खाटीक मटण व्यावसायिक महासंघाचा निर्णय

■पुणे। अभिजित येरल्लू,

पुण्यात २२ जानेवारीला प्रभू श्रीराम यांच्या अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त महाराष्ट्र हिंदूखाटीक मटण व्यावसायिक सर्व व्यवहार बंद करून ,प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त मिठाई वाटप करुन या उत्सवात सहभागी होणार असल्याचे महाराष्ट्र हिंदूखाटीक मटण व्यवसाईक महासंघाचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांनी जाहीर केले आहे .

२२ जानेवारी रोजी अयोध्या येथे प्रभू श्रीराम त्यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आनंद आणि उत्साह देशभर साजरा केला जात आहे. आपले सर्व मटण विक्री व्यवहार बंद करून या पवित्र कार्यक्रमात आनंद व उत्साहाने सहभागी होत असल्याची माहिती महाराष्ट्र हिंदूखाटीक मटण व्यावसायिक महासंघाचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांनी दिली. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी येथे उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात श्रीराममललांची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार असून, यादिवशी महाराष्ट्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ४ जानेवारी २०२४ रोजी केली होती.

अन्न सुरक्षा १२ वर्षे वाऱ्यावर; अपिली न्यायाधिकरणाची अद्याप स्थापना नाही

■मुंबई। विशाल कारंडे,

अन्नपदार्थांचे उत्पादन आणि व्यवसायामध्ये सहभागी असलेल्या कोणत्याही घटकाकडून अन्नपदार्थांच्या गुणवत्तेमध्ये तडजोड होऊ नये, यासाठी अन्न सुरक्षा कायदा २००६मध्ये आणण्यात आला. त्या अंतर्गत निकृष्ट दजार्चे उत्पादन नियंत्रित करण्यासाठी, तसेच दोषींवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी न्यायनिवाडा अधिकारी या पदासह अपिलीय सुविधेसाठी न्यायाधिकरण स्थापन करण्याचेही निर्देश देण्यात आले होते. मात्र, आज तब्बल १२ वर्षांनंतरही न्यायाधिकरणाची स्थापना झालेली नाही. दंडात्मक कारवाई, तसेच अपिलीय प्रकरणांमध्ये न्यायनिवाडा करण्यासाठी जिल्हादंडाधिकारी श्रेणीच्या जबाबदार व्यक्तीने या पदावर असणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र अन्न व औषध प्रशासनातील सहायक आयुक्त पदाचे अधिकारी या प्रक्रियेमध्ये सहभागी आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होते का, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. अन्न सुरक्षा कायद्यातंर्गत असलेली नियमावली २०११मध्ये लागू झाली. निकृष्ट गुणवत्तेचे अन्नपदार्थांचे उत्पादन नियंत्रित करण्यासाठी तसेच त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी न्यायनिवाडा अधिकारी या पदांची उपलब्धता करण्यात आली आहे.

'मन की बात विचार करून करावी लागते.'; उद्धव ठाकरेंचा टोला

■मुंबई।प्रतिनिधी,

मन की बात ही विचार करून करावी लागते. मात्र दिल की बात हीच खरी असते आणि आज तुम्ही लोकांनी माज्यासोबत केलेली ही दिल की बात होती, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी थेट मोदींवर निशाणा साधला आहे.त्यासोबतच त्यांनी बाळासाहेबांनी प्रमोद महाजनांना सांगितलेल्या विधानाचीही आठवण करून दिली आहे.

ठाकरे म्हणाले की, बाळासाहेबांनी सांगितले होते, एक दिवस मतदार हा केवळ हिंदू म्हणून मतदान करणार. आज ते होतांना दिसतेय आणि त्याचा कोण, कशाप्रकारे फायदा किंवा वापर करून घेत आहे, ते देखील आपण पाहत आहोत. पुढे बोलतांना ठाकरे म्हणाले, बाळासाहेबांनी सांगितलेले आज खरे ठरतेय.

मात्र भाकरी एकाने भाजली आणि त्या भाजलेल्या भाकरीवर आज कुणी दुसरेच पोट भरत आहेत. तुमच्या हातात जो भगवा आहे. त्या भगव्यात कोणताही फरक नाही. जाहीरातीत फरक करून रंगात फरक दाखवला जावू शकतो. मात्र या भगव्यात कोणताही फरक नाही. मग तो भगवा हा कोणाच्याही हातात असू द्या, भगवा हा भगवाच असल्याचे ठाकरे म्हणाले.

सौचालयाच्या भांड्यातील चिमुकली बालकल्याण समितीच्या ताब्यात; जीवदान देणाऱ्यांचा सन्मान

■उल्हासनगर। अनिकेत भंकाळ,

मागच्या आठवड्यात सार्वजनिक सौचालयाच्या भांड्यात टाकण्यात आलेल्या व उल्हासनगरातील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्यावर ठणठणीत झालेल्या चिमुकलीचा ताबा आज बालकल्याण समितीकडे देण्यात आला आहे. तसेच चिमुकलीला जीवदान देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्यांचा सन्मान समितीच्या वतीने करण्यात आला आहे. 11 जानेवारी रोजी सुभाष टेकडी परिसरात आंब्रपाली नगर येथे असणाऱ्या सार्वजनिक सौचालयाच्या भांड्यात स्त्री जातीच्या नवजात अर्भकाला टाकण्यात आले होते. रुपाली थाटे या महिलेला ही चिमुकली दिसल्यावर प्रविण सुर्यवंशी,आकाश अहिरे यांनी धाव घेतली. प्रविण सुर्यवंशी यांनी चिमुकलीला भांड्यातून बाहेर काढल्यावर आकाशने संदीप डोंगरे यांना फोनवर कळवले. डोंगरे यांनी घटनास्थळी पोहचून विठ्ठलवाडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांना फोनवर माहिती देऊन चिमुकलीला रुग्णालयात उपचारासाठी नेत असल्याचे सांगितले. आणि

प्रविण सुर्यवंशी,प्रकाश भागे,आकाश अहिरे यांच्या सोबत शासकीय मध्यवर्ती रुग्णालय गाठले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली बालरोगतज्ज्ञ डॉ. वसंतराव मोरे यांनी अर्भकावर तात्काळ उपचार केल्याने अर्भक सुदृढ होऊ लागले.

सुप्रिया सुळेंच्या बारामती मतदारसंघातील सीमेवर असलेल्या कामांची अजित पवारांकडून पाहणी

■पुणे। नितीन देवळेकर,

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोन्ही गटामधील नेत्यांमध्ये मागील सहा महिन्याच्या कालावधीत आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे .या सर्व घडामोडी दरम्यान आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कात्रज चौक ते खडी मशीन चौका दरम्यान येर्णाया रस्त्यांच्या कामांची पाहणी केली.तर बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या मतदार संघाच्या बॉर्डरवर असलेल्या कामांची पाहणी अजित पवार यांनी केल्याने सुप्रिया सुळे यांच्या मतदारसंघात अजित पवार यांनी अधिकच लक्ष घालण्यास सुरुवात केल्याची चर्चा सुरू झाली.त्या पाहणी दौयाबाबत अजित पवार म्हणाले की,मी पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री आणि राज्याचा उपमुख्यमंत्री आहे. कोणाच्या बॉर्डरवर आणि आतमध्ये काही नाही.सगळीकडे लक्ष देण हे माझ काम असल्याच सांगत सुप्रिया सुळे यांना टोला लगावला.

भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील एका कार्यक्रमामध्ये रस्त्यांच्या कामाबाबत घोषणा केली होती.त्याबाबत अजित

पवार यांना विचारले असता अजित पवार म्हणाले की,आता पुन्हा मागच कशाला काढतो.मागच किती ही काढल तरी काही अडचणी असतात,त्यामुळे आता माघच फार काही काढू नकोस,असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांची बाजू अजित पवार यांनी सावरून घेतल्याचे पाहण्यास मिळाले.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

स्वच्छतेची जीवनशैली

सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत अद्यापही जाणवणारा दिव्याखालचा अंधार दूर केला पाहिजे. स्वच्छतेसाठी स्पर्धा, प्रलोभन या गोष्टींचा वापर करावा लागणे, हीच गोष्ट मुदलातच खूप बोलकी आहे. परंतु सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत अद्याप आपल्याला एवढी मजल मारायची आहे, की अशा सर्व प्रकारचे प्रयत्न करण्याशिवाय पर्यायही नाही. पण जोपर्यंत ह्यासार्वजनिक स्वच्छताह्न प्रत्येकाच्या अंगवळणी पडत नाही, त्याची संस्कृती निर्माण होत नाही तोवर हा प्रश्न भेडसावत राहील, याचे भान विसरता कामा नये. ह्यस्वच्छ भारत अभियानांह्नतर्गत कामगिरी बजावलेल्या शहरांच्या आणि राज्यांच्या यादीवर नजर टाकल्यास स्वच्छतेच्या बाबतीत महाराष्ट्रासह काही राज्ये प्रगती करताना दिसताहेत, ही आनंदीचा बाब. अभियानाला सुरवात झाली तेव्हा शंभरच्या आत शहरांचा सहभाग होता.

अभियानाच्या विविध गटातील सहभागी शहरांचा आकडा पाच हजारापार गेला, हे उल्लेखनीय. पश्चिम बंगालमधील शहरे स्वच्छतेत सुमार ठरली असली तरी त्यांचे स्पर्धेत पहिल्यांदाच उतरणे हेही महत्त्वाचे. गेली सलग सात वर्षे देशात स्वच्छतेत अव्वल ठरलेल्या इंदूरने मारलेली बाजी आणि स्वच्छतेचा जीवनशैली म्हणून केलेला अंगीकार अनुकरणीय आहे. तीन दशकांपूर्वी सुरतमध्ये प्लेगचे साथ आली होती. त्या सुरतने इंदूरच्या बरोबरीने स्वच्छतेत घेतलेली आघाडी नागरिक आणि प्रशासनाच्या प्रयत्नांच्या ध्यासाची साक्ष देते. या यादीत नवी मुंबई, पुणे, सासवड, लोणावळा, कराड, विटा, सिल्लोड, पाचगणी, देवळाली अशा कितीतरी गावांनी बजावलेली कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. महत्त्वाचे म्हणजे, स्वच्छतेत राज्याच्या गटात महाराष्ट्राचे अव्वल ठरणे हुरूप वाढवणारे आहे.

सुमारे आठ वर्षांपूर्वी देशव्यापी स्वच्छता अभियान सुरू करताना सरकारने दूरगामी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली होती. समाजातील सर्व घटकांत स्वच्छतेबाबत जाणीव जागृती निर्माण करणे आणि त्याला व्यापक चळवळीचे रूप देऊन लोकसहभाग वाढवायचा होता. स्वच्छतेबाबत गावखेड्यापासून ते महानगरांपर्यंतच्या पातळीवर स्पर्धात्मक वातावरण निर्माण करून त्या-त्या भागातील स्वच्छता आणि आरोग्य यांचे संवर्धन करणे हादेखील हेतू होता. या कामगिरीचे मोजमाप करण्यासाठी थेट त्या भागाची पाहणी आणि जनतेचा त्याबाबतचा अभिप्राय आणि इतर निकषांचा वापर केला. या सगळ्यांमुळे स्वच्छता ही जीवनशैली बनली, ही जमेची बाजू म्हणावी लागेल. सुरतमधील प्लेगच्या साथीनंतर स्वच्छतेवर अधिक भर देऊन दारोदारी कचरा संकलक घंटागाड्या पाठवणे आणि त्यानंतर संकलित कचऱ्यावर प्रक्रिया यासाठी स्थानिक प्रशासनांनी आतापर्यंत अनेक प्रयोग केले. सरलेल्या वर्षात 'कचऱ्यातून संपत्तीनिर्मिती' हे अभियानाचे ध्येय होते. त्यात बऱ्यापैकी यश आले आहे. देशात अव्वल ठरलेल्या महाराष्ट्रापुरते बोलायचे तर ८९टक्के घरांतून कचरासंकलन, त्याचे उगमापाशीच ६७ टक्के वर्गीकरण होत असल्याचे आढळले. राज्यात चांगली कामगिरी करणारी शहरे त्यामुळेच स्वच्छतेत आघाडी घेऊ शकली आहेत. शहरे स्वच्छ झाली तरी त्यातून निर्माण होणाऱ्यावर कचऱ्यावर प्रक्रिया हे मोठे आव्हान असते. ज्या भागात तो टाकला जातो आणि जिथे त्यावर प्रक्रिया होते, त्या भागातून होणारा विरोध पुणे, औरंगाबाद, नाशिकसह अनेक शहरांनी अनुभवला आहे. त्यातून प्रदूषणासह आरोग्यावर विपरित परिणामांपर्यंत नवनवे प्रश्नही जन्माला आले आहेत. तथापि, २०१४मध्ये १५-१६टक्के कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया व्हायची. हे प्रमाण आता ७६ टक्क्यांवर पोचले आहे. आगामी काळात सगळ्याच कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रियेचे उद्दिष्ट असल्याचे नागरविकास मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी सांगितले. ही या अभियानाची यशस्वीता म्हटली पाहिजे. चालू वर्षासाठी 'रिड्युस, रियुज आणि रिसायकल' म्हणजे कचऱ्याची कमीतकमी निर्मिती करणे, कचऱ्यातील वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि कचऱ्यातून टिकाऊ वस्तूंची निर्मिती हे अभियानाचे ध्येय असेल.

साऱ्या जगभरच या सूत्राचा अधिकाधिक अंगीकार होतो आहे. वस्तूनिर्मिती कंपन्याही आपल्या उत्पादनातूनही हे काही प्रमाणात राबवत आहेत. कोरोनाच्या महासाथीमध्ये स्वच्छतेचे महत्त्व आणि जीवनशैली म्हणून त्याचा स्वीकार किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित झाले आहे. त्यामुळेच स्वच्छता अभियान सरकारी मोहीम आहे आणि त्याचे दायित्व स्थानिक स्वराज्य संस्थांचेच आहे, या मानसिकतेतून नागरिकांनी बाहेर पडल्याशिवाय त्याचे जीवनशैलीत रूपांतर होणार नाही.भूमिगत गटारे साफ करणाऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून त्या कामाच्या यांत्रिकीकरणाची सूचना राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी नुकतीच केली.

WHY THYROID SYMPTOMS WORSEN IN WINTER? KNOW WHAT INCREASES RISK OF THE DISORDER

Winters can throw your thyroid levels out of gear. This happens because the cold temperature may increase metabolism signalling the thyroid gland to produce more of hormones to regulate metabolic activity. People who do not have a pre-existing thyroid issue may experience slightly elevated TSH levels or subclinical hypothyroidism in winter. This can result in symptoms like constipation, depression, slow movements, brain fog, aches and pains, fatigue and feeling too cold. In winter, reduced sunlight and changes in diet can also influence thyroid functions. Winter diseases and depression may cause changes in hormones. Limiting processed food and consuming wholegrains and seasonal vegetables and fruits can benefit thyroid function and help you feel better.

What is hypothyroidism

"Hypothyroidism in simple terms means your thyroid gland isn't making enough thyroid hormones. Think of the thyroid as a car engine - if it doesn't produce sufficient fuel (thyroid hormones), your body's processes slow down. Common symptoms include fatigue, weight gain, feeling cold, and sluggishness. It's like your body's energy thermostat is set too low," says Dr Anu Gaikwad, Consultant Diabetologist & HOD Geriatric Medicine, DPU Super Specialty Hospital, Pimpri, Pune

Why do thyroid hormones increase during the winter season?

During winter, thyroid hormone levels can rise due to various factors. "Cold temperatures prompt the body to increase metabolic activity to maintain internal warmth. This heightened metabolic rate can stimulate the thyroid gland to produce more hormones, particularly thyroxine (T4) and triiodothyronine (T3), which regulate metabolism. Reduced sunlight exposure in winter may also impact the body's circadian rhythm, influencing thyroid function. Seasonal changes in diet, with potential alterations in nutrient intake, can further contribute to thyroid fluctuations. Additionally, winter illnesses and stressors may trigger hormonal adjustments as the body responds to environmental challenges. While these factors collectively influence thyroid hormone levels, individual responses can vary," says Dr Gaikwad.

Who is at a risk of being most affected by thyroid?

Thyroid disorders can affect anyone, but certain factors may increase the risk. Women are more prone than men, especially as they age. Dr Gaikwad shares more reasons behind thyroid trouble.

• Individuals with a family history of thyroid conditions face a higher risk, indicating a genetic component.
• Autoimmune diseases like Hashimoto's or Graves' disease can elevate susceptibility.
• Iodine deficiency, prevalent in some regions, is a risk factor.
• Radiation exposure, certain medications, and neck or thyroid surgeries may also contribute.

Pregnancy and postpartum periods increase the likelihood, as do stress and other health conditions.

• Regular check-ups are advisable, especially for those with risk factors, to monitor thyroid health.

Side effects of hypothyroidism

Having hypothyroidism can potentially make you more prone to other health issues or side effects. If not properly managed, it may lead to complications such as heart problems, high cholesterol, and weight gain. "Hypothyroidism can also affect fertility and increase the risk of pregnancy complications. Additionally, it may contribute to conditions like depression and cognitive issues. Regular monitoring and appropriate treatment, usually involving thyroid hormone replacement medication, are crucial to manage hypothyroidism effectively and reduce the risk of associated health concerns. If you suspect thyroid issues or experience symptoms, consulting a healthcare professional is important for accurate diagnosis and tailored treatment," adds Dr Gaikwad.

'ही' फळे रिकाम्या पोटी खाऊ नयेत, अन्यथा आरोग्यावर होतील दुष्परिणाम

खराब जीवनशैलीमुळे तंदुरुस्त राहणे देखील कठीण झाले आहे. निरोगी आरोग्यासाठी आपल्या खाण्या-पिण्याची योग्य वेळ असणं देखील महत्त्वाचे आहे. आपल्या आहारात प्रत्येक गोष्ट खाण्यासाठी एक वेळ दिली आहे. त्यानुसार फळ खाण्याबद्दलही आहारात काही नियम देण्यात आले आहेत. जसे की अनेकांना ही गोष्ट ठाउक नसेल की कॅफिनयुक्त पदार्थांचे रिकाम्या पोटी सेवन करणं आरोग्यासाठी धोकादायक ठरु शकते. या कॅफिनयुक्त पदार्थांमध्ये काही फळांचा देखील समावेश आहे. पण तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल की, काही फळांचे रिकाम्या पोटी सेवन केल्यामुळे आरोग्याविषयक समस्या देखील उद्भवू शकतात.

फळे आरोग्यासाठी चांगली मानली जातात. मात्र या फळांचे उत्तम आणि योग्य पद्धतीने सेवन करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. फळे खाण्याची योग्य वेळ कधी आहे आणि त्याचे शरीरावर काय परिणाम होतात याची माहिती प्रत्येकाला असणं गरजेचे आहे. दरम्यान 2019 मध्ये बिहारमधील 125 मुलं तापामुळे मृत्यूमुखी पडली अशी बातमी समोर आली होती. सुरुवातीला ताप कशामुळे येतो, नेमकं या मुलांच्या खाण्यात काय आलं हे स्पष्ट होत नव्हते. पण ॲक्युट इन्सेफलाइटिस सिंड्रोम या प्रकारच्या तापाने मृत्यू झाल्याचे उघड झाले. या मुलांनी लिची फळं खाल्ल्याने हा प्रकार घडला अशाही बातम्या प्रसिद्ध झाल्या. कारण लिची हे फळ कच्चं किंवा उपाशीपोटी खाल्याने धोका निर्माण होऊ शकतो.

रिकाम्या पोटी का खाऊ नयेत फळे : फळे खाण्याचे अनेक फायदे आहेत, परंतु जेव्हा तुम्ही ते चुकीच्या वेळी खातात तेव्हा ते तुमचे नुकसान करू शकतात. विशेषतः जेव्हा तुम्ही ते रिकाम्या पोटी खातात. कारण रिकाम्या पोटी कोणत्याही फळाचे सेवन केले तर ते आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकते. रिकाम्या पोटी ॲसिडयुक्त फळांचे कधीही सेवन करू नका. तसेच फळे गोड असतात आणि सकाळी खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढते. त्यामुळे मधुमेहाची पातळीही वाढू शकते.

रिकाम्या पोटी कोणती फळे खाऊ नयेत?

केळी : केळी जर रिकाम्या पोटी खाल्लातर पोटॅशियमचे प्रमाण वाढून तुमच्या पचनसंस्थेवर ताण येऊ शकतो. यामुळे, पोटाला सकाळपासून सूज येऊ शकते त्यामुळे तुम्ही दिवसभर अस्वस्थ राहू शकता. याशिवाय तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ शकतो.

संत्री आणि मोसंबी : संत्री आणि मोसंबी यासारख्या लिंबूवर्गीय फळांचे सेवन केल्याने तुम्ही आजारी पडू शकता. दोन्ही फळांचे सेवन केल्याने तुमचे पचनक्रिया बिघडू शकते. याशिवाय ते आम्लयुक्त पीएच वाढवते आणि सकाळपासून गॅस होऊ शकते.

किवी : किवीचे सेवन आपल्या पोटासाठी अनेक प्रकारे फायदेशीर ठरु शकते. यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे रिकाम्या पोटी घेण हानिकारक ठरू शकते. याचे सेवन केल्याने छातीत जळजळ, आंबट चव आणि आम्लता वाढू शकते. किंवा साखरेमुळे मधुमेहाच्या रुग्णांची संख्या वाढू शकते.

अननस : रिकाम्या पोटी अननस खाण्यायोग्य नाही कारण त्यात फ्रक्टोज जास्त प्रमाणात असते. याशिवाय यामध्ये व्हिटॅमिन सी सोबत फायबर देखील असते, जे एकत्रितपणे चयापचय कमी करते. त्यामुळे दिवसभर अन्न नीट पचत नाही. त्यामुळे रिकाम्या पोटी किंवा फळांचे सेवन टाळा.

आंबा : तज्ज्ञांच्या मते, रिकाम्या पोटी आंब्याचे सेवन करणे शरीरासाठी घातक ठरू शकते. कारण या फळामध्ये साखरेचा अधिक पुरावा आहे. रिकाम्या पोटी या फळाचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. त्यामुळे मधुमेहाचा त्रास असलेल्यांनी आंब्याचे रिकामी पोटी सेवन करु नये. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अनियंत्रित होऊ शकते. यामुळे तुमच्या निरोगी आरोग्याला कोणताही फायदा होणार नाही.

रामायणातील 'रामा'ने खऱ्या आयुष्यात भोगला १४ वर्षांचा वनवास; कामासाठी जोडावे लागले होते हात

मराठमोळी सध्या सगळ्या देशभरात प्रभू रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची तयारी सुरु आहे. २२ तारखेला आयोध्येमध्ये राम मंदिरात श्रीरामाच्या मुतीर्ची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. त्यामुळे या ऐतिहासिक सोहळ्याचा साक्षीदार होण्यासाठी देशभरातील अनेक मान्यवर व्यक्ती आयोध्येमध्ये पोहोचले आहेत. यात १९८७ साली प्रसारित झालेल्या रामायण या गाजलेल्या मालिकेतील कलाकारही पोहोचले आहेत. इतकंच नाही तर हे कलाकार सातत्याने चर्चेत येत आहेत. यामध्येच रामायण मालिकेत प्रभू रामचंद्राची भूमिका साकारणारे अभिनेता अरुण गोवील यांची एक जुनी मुलाखत चर्चेत आली आहे. या मुलाखतीमध्ये त्यांनी त्यांच्या स्ट्रगल काळावर भाष्य केलं आहे. १९८७ मध्ये दूरदर्शनवर रामानंद सागर यांची रामायण ही पौराणिक मालिका प्रसारित झाली होती. या मालिकेने देशभरात तुफान लोकप्रियता मिळवली. इतकंच नाही तर या मालिकेतील कलाकारांना प्रेक्षक आजही देवासमान मानतात. परंतु, या मालिकेमुळे या कलाकार मंडळींना जितकी लोकप्रियता मिळवली. तितकाच त्यांचा तोटाही झाला.

'हृदय मै श्रीराम है!' पंतप्रधान मोदींनी शेअर केलं आर्या आंबेकरचं गाणं, भावूक होत म्हणाली...

मराठमोळी सध्या देशभरातील वातावरण श्रीराममय झालं आहे. २२ जानेवारी रोजी अयोध्या नगरी रामाच्या गजराने दुमदुमणार आहे. अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर अखेर अयोध्येत रामललाची मूर्ती प्रस्थापित होणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते राम मंदिराचे उद्घाटन होणार आहे. प्रत्येक जण आपापल्या परीने यामध्ये खारीचा वाटा देत आहे. संगीतकार सलील कुलकर्णी यांनी श्रीरामावर एक सुंदर गाणं रचलं आहे. दिग्गज गायक सुरेश वाडकर आणि गायिका आर्या आंबेकर यांच्या आवाजात गाणं रेकॉर्ड करण्यात आलं आहे. 'हृदय मै श्रीराम है' असे गाण्याचे बोल आहेत. श्रोत्यांनी तर गाण्याला दाद दिलीच आहे विशेष म्हणजे थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही हे गाणं त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन शेअर केलं आहे. यामुळे आयार्चा आनंग गगनात मावेनासा झालाय.

HEALTH AND SPORTS

DRAVID GIVES T20WC VERDICT ON SHIVAM DUBE AFTER HARDIK'S CONTENDER WINS PLAYER OF THE SERIES AWARD VS AFG

Dubai: One of the crucial questions India needed to answer heading into the T20 World Cup in June was whether they could find a backup for injury-prone Hardik Pandya. India never had the luxury of boasting too many quality fast-bowling all-rounders. The void became greater when the legendary Kapil Dev hung his boots in 1994. Multiple players were tired in that position in the next two decades. Some got success too but no one could do the job for a long time consistently until the emergence of Hardik. The all-rounder, who burst onto the scene in 2016, has been a match-winner in white-ball cricket. However, his struggle with a back injury hurt India in the 2021 T20 World Cup, while his absence due to an ankle twist left the team imbalanced in the 2023 ODI World Cup final. India brought back Shivam Dube in the three-match series against Afghanistan to find an able backup for Hardik. The 30-year-old, who had made his debut in 2019 under similar circumstances, was initially recalled for the home series against Australia in November last year, but he remained the only player not to feature in the five matches. He was later dropped for the tour of South Africa before being called back in India's final assignment before the T20 World Cup in June. Dube earned a call-back to the Indian team after a stellar run for Chennai Super Kings in IPL 2023 and the Mumbai all-rounder continued his sublime form with the bat against Afghanistan, where he took down spinners in a similar fashion en route to his back-to-back match-winning fifties. The right-arm bowler also picked up two wickets in three matches as Dube was named the Player of the Series in India's 3-0 win against Afghanistan.

VIRAT KOHLI DASHES INTO TROPHY CELEBRATIONS WITH 'MICHAEL JACKSON SLIDE', BREAKS INTERNET WITH VIRAL DANCE STEP



NEW DELHI : It's been exactly two months since India lost the World Cup final against Australia, but Rohit Sharma it seems, like many more, is yet to move on from the heart-breaking defeat endured on the night of November 19. As captain, Rohit has since led India to a famous Test win against South Africa in Cape Town and only two days ago, completed a 3-0 sweep against Afghanistan, but the pain of the World Cup final is yet to completely heal. Before leaving for the tour of South Africa, Rohit had already addressed the 'tough time' he went through after the loss. But as Indian cricket moved on... or at least tried to, Rohit appeared to be overcoming it as well. But it was almost as if his wounds reopened when a question related to that evening in Ahmedabad was thrown at him. When asked what he did to get himself back in the right mindset, Rohit stuttered before explaining the importance of the 50-over World Cup and what winning it would have meant to him. "See, I don't want to think about it now. Absolutely (on the visible disappointment on his face). The 50-over World Cup for me is the biggest prize of them all. It's not like I don't consider the T20 World Cup or the World Test Championship important, but we've grown up watching the 50-over World Cup. And when it's in India, it's a big deal. We tried, but unfortunately couldn't do it. The whole team was upset, fans were too. But now the opportunity that we have, we will try to get the most out of it and win the World Cup," Rohit told the official broadcaster after the match.

'LIKE BEFORE AND AFTER CHRIST, YOU CAN DIVIDE HIS CAREER...': ASHWIN BACKS 'YUVRAJ SINGH LITE' DUBE FOR T20WC SQUAD

NEW DELHI : India head Rahul Dravid did not want to give away the 2024 T20 World Cup plans yet. With the Indian Premier League (IPL) up next, starting at the end of March, the selectors will still have plenty of options to judge and select from. But veteran Indian spinner Ravichandran Ashwin has backed Shivam Dube for a role in the World Cup squad after the all-rounder's series-winning performance against Afghanistan last week. Dube, who made his debut for India in 2019, was dropped for the three-match series in South Africa after not making the final XI in any of the five T20Is against Australia in November. However, in India's final T20I series before the World Cup in June, against Afghanistan at home, Dube was called back and tested as a potential backup option for Hardik Pandya. Batting at No. 4 for India against Ibrahim Zadran's men, Dube did precisely what earned him a call-up in the Indian squad after three years. He smashed back-to-back match-winning fifties while also picking two wickets with his right-arm pace-bowling variety as Dube was adjudged as the Player of the Series in India's 3-0 win. Impressed with Dube's performance in the series, Ashwin, speaking on his YouTube channel, reckoned that the Mumbai-based cricketer would be an ideal batter for India to have in West Indies, where the conditions are similar to that of Chepauk, Chennai Super Kings' home ground, the IPL franchise for which the 30-year-old plays for.

AMAZING LUNG EXERCISES TO KEEP RESPIRATORY DISEASES AT BAY

The deadly combination of bitter cold conditions and high pollution levels in many parts of the country is leading to a spike in cases of respiratory illnesses. People who have pre-existing lung diseases like asthma and COPD must take all measures to take care of this crucial organ and avoid cold as well as pollution exposure. Even if pollution levels are moderate or less in your city, with age, lung capacity may decrease, and it's important to incorporate lung-care measures into your routine. External factors like smoking, pollution, and other lung issues can speed up the deterioration of your lung health. Breathing and certain lung exercises can help prevent the worsening of your lung health.

EFFECTIVE LUNG EXERCISES: Let's explore some effective exercises shared by Dr Kutty to enhance your lung health and functional capacity.

1. Diaphragmatic Breathing : •To start this breathing technique, sir or lie comfortably
•Then, place one hand on the chest area and the other on the abdomen
•After this, inhale deeply through the nose, allow the abdomen to expand
•Exhale slowly that will let your abdomen to contract
•Repeat this process for several breaths, focusing on deep, deliberate breaths.
2. Pursed-Lip Breathing : •Inhale through your nose for a count of two
•Exhale through pursed lips for a count of four
•This simple technique aids in regulating your breathing and keeping airways open for an extended period
3. Deep Breathing with Breath Retention : •Inhale deeply through your nose
•After this, make sure to hold the breath for few minutes
•Exhale slowly through your mouth
•This exercise contributes to improved lung capacity
4. Alternate Nostril Breathing : •Sit comfortably with a straight spine
•Then, with the help of your right thumb close the right nostril
•Inhale deeply through your left nostril
•Make sure to close the left nostril with the right ring finger, releasing your right nostril.
•Exhale through your right nostril
•Always inhale through the right nostril, close it, and exhale through the left nostril.
•Repeat this cycle several times

Performing these exercises at least thrice a week for up to twelve weeks, improves lung health and overall health quite significantly.

SUPERFOOD LEMON: KNOW THESE BENEFITS OF NIMBU

Pucker up, folks, because it's time to celebrate the mighty lemon, also known as nimbu in India. Often relegated to squeezing into our chai or lemonade, this little sunshine-hued fruit packs a powerful punch of health benefits that deserves recognition. So, ditch the sugary sodas and dive into the refreshing, revitalising world of nimbu with these 5 amazing benefits

Rich in Vitamin C: Lemons are renowned for their exceptional Vitamin C content, a vital nutrient renowned for its immune-boosting properties. A robust immune system is crucial for warding off infections and illnesses. Regularly consuming lemons can fortify your body's defences, providing a shield against various health challenges.

Aids in digestion: The natural acidity of lemons plays a pivotal role in supporting digestion by stimulating the production of digestive juices, lemons aid in alleviating common digestive issues such as indigestion and bloating. Starting your day with warm lemon water can kickstart your metabolism, contributing to a more efficient digestive system.

Alkalising properties: Despite their initial acidic taste, lemons exhibit alkalising properties upon metabolism. Maintaining a balanced pH level in the body is crucial for optimal health. Lemons contribute to neutralising excess acidity, creating an environment that may help prevent various health issues associated with high acidity levels.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

रामाचा उत्सव घरोघरी साजरा होणार; दीपोत्सवानिमित्त कंदिलांच्या मागणीत वाढ

■ठाणे। प्रतिनिधी,

आयोध्यातील राम मंदिराचे उद्घाटन आणि रामाच्या मूतीर्ची प्रतिष्ठापना या सोहळ्याचा उत्साह देशभरात पाहायला मिळत आहे. या सोहळ्यानिमित्त अनेक संस्था आणि कुटूंबांकडून दिपोत्सव साजरा करण्याची तयारी सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर दिवाळीनंतर आता पुन्हा कंदिलाच्या मागणी वाढ झाल्याचे चित्र आहे. आयोध्यातील राम मंदिराच्या सोहळ्यानिमित्त बाजारात राम, हनुमान, मंदिर याचे छायाचित्र असलेले कंदिल विक्रीसाठी दाखल झाले आहेत. या कंदिलांना नागरिकांकडून मोठी मागणी असल्याचे ठाण्यातील कंदिल विक्रेत्यांनी सांगितले.

अयोध्येत २२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे राम मंदिराचे उद्घाटन आणि मुतीर्ची प्रतिष्ठापना निमित्ताने देशभरात रामाचा जागर सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक संस्था आणि कुटूंबांकडून दिपोत्सव साजरा करण्याची तयारी सुरु आहे. या सोहळ्याच्या अनुषंगाने ठाणे, मुंबई तसेच उपनगरातील बाजारपेठाही बहरलेल्या दिसून येत आहेत. रामाचे टी-शर्ट, साड्या तसेच विविध वस्तूंसह दिपोत्सव साजरा करण्यासाठी बाजारात कंदील दाखल झाल्याचे चित्र आहे. अनेक संस्था, गृहसंकुले तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून कंदिल खरेदीसाठी मोठी मागणी आहे. राम, हनुमान, सीता तसेच मंदिर असे छायाचित्र असलेले पर्यावरण पूरक कंदिल आहेत. २५० ते ३५० रपये दराने प्रति कंदिल ची विक्री करण्यात येत आहे. गेले २० ते २५ दिवसांपासून या कंदिलाची मागणी वाढली आहे. मागणी नुसार हे कंदिर तयार करण्यात येत असल्याची माहिती कंदिल विक्रेत्यांनी दिली. दिवाळीनंतर पुन्हा एकदा आयोध्यातील राम मंदिर सोहळ्याच्या निमित्ताने कंदिलाच्या बाजारपेठेला बहर आला असल्याची प्रतिक्रिया कंदिल विक्रेते मधुसूदन डोईफोडे यांनी दिली.

बॅनरबाजीतून पुन्हा एकदा राजकीय शक्तीप्रदर्शन, पालिकेचा कानाडोळा

■ठाणे। प्रतिनिधी,

संपूर्ण देश सध्या राम मंदिराच्या उद्घाटनाच्या निमित्ताने राम मय झाला आहे. ठाण्यातही सध्या तसेच वातावरण दिसत आहे. परंतु ठाण्यात या निमित्ताने पुन्हा एकदा बॅनरबाजीला उत आल्याचे चित्र शहरभर दिसत आहे. एकीकडे स्वच्छ ठाण्याचा नारा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र बॅनरबाजीने पुन्हा एकदा शहरातील महत्वाचे चौक, रस्ते, अगदी नव्याने रंग मारण्यात आलेल्या मेट्रोच्या पिलरवर देखील पुन्हा बॅनरबाजीतून शक्तीप्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. विशेष म्हणजे महापालिका मुख्यालयाच्या समोरच जेथून आयुक्त व पालिकेचे इतर पदाधिकारी रोजच्या रोज ये जा करीत असतात, त्या परिसराला देखील बॅनरबाजीचा विळखा पडल्याचे चित्र आहे. परंतु या बॅनरबाजीकडे महापालिकेने जणू कानाडोळाच केला असल्याचे चित्र दिसत आहे. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून मागील काही दिवसापासून अनाधिकृत बॅनर पोस्टरवर कारवाई केली जात असल्याचे दिसत होते. परंतु तो केवळ फार्स असल्याचेच स्पष्ट झाले आहे.

ठाण्यातील एकही रस्ता एकही चौक आज मोकळा श्वास घेतांना दिसत नाही. महापालिका मुख्यालयाच्या समोर कोणी भावी आमदाराचे बॅनर लावले आहेत, तर कोणी रामलल्लाचे बॅनर लावून शक्ती प्रदर्शन केले आहे. महापालिका मुख्यालयाजवळच कॉमन मॅनचा एक चौक आहे. परंतु आजच्या घडीला तो कॉमन मॅनही बॅनरबाजीच्या विळख्यात अडकल्याचे चित्र आहे. दुसरीकडे कॅसलमिल नाका येथील चौक, जांभळी नाका येथील चिंतामणी चौक आदींसह शहरातील इतर चौकही सध्या बॅनरबाजीने पुर्ते रंगले आहेत.

महापालिकेच्या माध्यमातून चौक सुशोभिकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्यानुसार काही चौकांनी एक वेगळी झळाळी मिळाली होती. परंतु आज ते चौकही या बॅनरबाजीच्या विळख्यात अडकल्याचे चित्र आहे. तिकडे शहरातील प्रमुख रस्त्यांवर ते अगदी गल्ली बोळातही सध्या बॅनरबाजीला उत आल्याचे चित्र आहे.

मेट्रोचे पिलर पुन्हा विद्रुप

मागील महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहर विद्रुप होणार नाही, या दृष्टीने उपाय योजना कराव्यात, तसेच मेट्रोच्या पिलरवर होणाऱ्या जाहीरातीबाजीच्या विरोधात देखील नाराजी व्यक्त केली होती.

अयोध्येतील राम मंदिराच्या अक्षतांचा मान 'वाडा कोलम'ला, वाड्यातून १० टन कोलम रवाना

■वाडा । प्रतिनिधी,

येत्या २२ जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात रामलल्लाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. या सोहळ्याला उपस्थित असलेल्या भक्तजनांना तांदळाच्या अक्षतांचे वाटप होणार आहे. या अक्षतांचा मान वाडा येथून उत्पादीत होणाऱ्या वाडा कोलमला मिळाला असून १० टन अक्षता वाडा येथून आयोध्येकडे रवानाही झाल्या आहेत.

अत्यंत चवदार असलेल्या, सेंद्रिय खतापासून उत्पादन केलेल्या वाडा कोलमला भारतातच नव्हे तर अनेक देशांतून मागणी वाढत आहे. अनेक खवय्यांच्या पसंतीस उतरलेल्या वाडा कोलमच्या अक्षता अयोध्येत लाखो भाविकांच्या हातात जाणार असल्याने वाडा कोलमचा हा मोठा सन्मान असल्याचे वाड्यातील वाडा कोलम उत्पादक शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे. वाडा कोलमचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या एका कृषी उत्पादन संस्थेने दोन दिवसांपूर्वी १० टन वाडा कोलमचा तांदूळ अयोध्येकडे रवाना केला. दिलेल्या दानाबाबत कुठेही वाच्यता होऊ नये म्हणून त्यांनी आपल्या संस्थेचे नाव उघड न करण्याचे सांगितले. दरम्यान पालघर जिल्ह्यात राममय वातावरण निर्माण होऊ लागले आहे. दररोज ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

टपरीमाफियांना पालिकेचा दणका, मोक्याच्या ठिकाणची अतिक्रमणे हटविली

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

महामार्गासह मोक्याच्या ठिकाणी अतिक्रमण करणाऱ्या टपरीमाफियांविरोधात महानगरपालिकेने मोहीम उघडली आहे. विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या पिवळ्या, निळ्या टपऱ्या हटविल्या आहेत.तर बेवारस वाहने, अनधिकृत बॅनरही हटविण्यास सुरुवात केली आहे. मार्जिनल स्पेसचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांनाही नोटिसा दिल्या आहेत. पालिकेच्या मोहिमेमुळे अतिक्रमण करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

स्वच्छता अभियानात देशात तिसरा नंबर मिळविणाऱ्या नवी मुंबईत आता अतिक्रमणमुक्त शहर मोहीम राबविण्यास सुरुवात झाली आहे. अतिक्रमणविरोधी पथकाचे उपायुक्त राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरभर कारवाईचा धडाका सुरू झाला आहे. सायन - पनवेल महामार्गावर वाशी ते नेरूळदरम्यान बसथांब्याच्या बाजूला विनापरवाना अनधिकृत टपऱ्या सुरू झाल्या होत्या.

टपरीमाफियांच्या वर्षानुवर्षाच्या अतिक्रमणांवर हातोडा चालविण्यास सुरुवात झाली आहे. मनपाच्या पथकाने सर्व टपऱ्या उचलण्यास सुरुवात केली आहे. यंत्राच्या साहाय्याने टपऱ्या उचलून डम्पिंग ग्राउंडवर नेण्यात येत आहेत. अतिक्रमणाचे पिवळे, निळे साम्राज्य खालसा झाले आहे. अनेक ठिकाणी विनापरवाना निराविक्री केंद्रे सुरू झाली होती. याशिवाय रात्री आइसक्रीम विक्रेत्यांनीही अनेक ठिकाणी व्यवसाय सुरू केला होता. या गाड्या उचलण्यासही सुरुवात केली आहे.

उपायुक्त राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या मोहिमेचे नागरिकांनीही स्वागत केले आहे. अनेक अनधिकृत पानटपरी चालक महानगरपालिकेच्या परवानगीचा फलक लावून व्यवसाय करीत होते. महामार्गावरही जागा अडविली होती. बेवारस वाहनांमुळे शहर स्वच्छतेला अडसर निर्माण झाला होता.

मनपाने सर्व विभागांत कारवाई सुरू केल्यामुळे सामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. रस्त्यांवरील बेवारस वाहनांमुळे शहर स्वच्छतेमध्ये अडसर येऊ लागला होता.

उल्हासनगरातील कचरा उचलणाऱ्या ठेक्याची पोलखोल

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

शहरातील कचरा उचलणारी कंपनी अटीशतीर्चे उल्लंघन करीत असून कंपनीवर कारवाई करण्याची मागणी लढा कामगार संघटनेचे संदीप गायकवाड यांनी महापालिका आयुक्त अजीज शेख याना केली. तसेच पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, कामगार आयुक्त आदीना पत्र देऊन कामगारांचे प्रश्न सुटले नाहीतर, १ फेब्रुवारीपासून आंदोलनाचा इशारा देण्यात आला.उल्हासनगर महापालिकेने शून्य कचरा संकल्प करून शहरातील कचरा उचलण्याचा ठेका कोणार्क नावाच्या कंपनीला दिला. कचरा उचलण्यावर दिवसाला ८ लाख, महिन्याला २ कोटी ४० लाख तर वर्षाला ३० कोटी रुपये खर्च केला जातो. अशी माहिती लढा कामगार संघटनेचे संदीप गायकवाड यांनी दिली. ठेक्याच्या अटीशतीर्नुसार कामगारांचे नियमित पगार काढले जात नसून त्यांना आरोग्य सुविधा दिल्या जात नाही. तसेच शासनानुसार कमीतकमी पगार दिला जात नाही. असा आरोप लढा संघटनेचे अध्यक्ष संदीप गायकवाड यांनी केला. तसेच शहरातून एकून २०० मेट्रिक टन कचरा निघत असतांना तो जास्त करण्यासाठी डंपर मधून माती व दगड आणून वजन ४०० मॅट्रिक टन केला जात असल्याचा गंभीर आरोप गायकवाड यांनी केला.

अंबरनाथ तालुक्यात भीषण पाणीटंचाई; पाच दिवसांतून एकदा पाणीपुरवठा

■अंबरनाथ। प्रतिनिधी,

अंबरनाथ तालुक्यातील लहान गावे तसेच पाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाईची समस्या उद्भवल्याचे चित्र पहायला मिळत आहे. राज्य शासनाकडून जल जीवन मिशन पाणीपुरवठा योजनांची कामे सुरू असली तरी ही कामे पूर्ण होण्यास अद्याप अवधी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक गाव, पाड्यांत पाच दिवसांतून एकदा पिण्याचे पाणी मिळत असल्याने पाण्यासाठी महिला, लहान मुलींची पाण्याच्या टाक्यांजवळ झुंबड उडत आहे.

नैसर्गिक जलस्त्रोत आणि मुबलक पाण्याचा साठा असलेल्या धरणांचा वेढा असलेल्या अंबरनाथ तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या पाणीटंचाईची स्थिती आहे. अंबरनाथ तालुक्यात २८ ग्रामपंचायती आहेत. यातील अनेक गावे धरण क्षेत्रापासून हाकेच्या अंतरावर आहेत.

बदलापूरपासून जवळच असलेल्या चरगाव या ग्रुप ग्रामपंचायतीत आठ पाडे आहेत. प्रत्येक गावात आठशे ते हजार लोकवस्ती आहे. येथील नागरिकांना पिण्यासाठी मुबलक पाणी उपलब्ध नसल्याने मोठे हाल होत आहेत. गावात असलेल्या बोअरवेलमधील पाणी एका टाकीत साचवून ठेवले जाते. हे पाणी नागरिकांना पाच दिवसांतून एकदाच उपलब्ध होत असल्याने पाणी भरण्यासाठी टाकीजवळ गावातील महिला आणि लहान मुलींची एकच झुंबड उडते. सध्या या गावामध्ये जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनंतर्गत विहीर, पाण्याच्या टाक्या बांधण्याचे काम सुरू असून अनेक नवीन बोअरवेलची कामे सुरू असल्याचे पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात येत आहे. योजनांतर्गत ५० टक्के कामे पूर्ण झाली असून फेब्रुवारीपर्यंत ही कामे पूर्ण होणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी दिली. शासकीय योजनांचा संथ कारभार पाहता नागरिकांना जानेवारी महिन्यातच पाच दिवसांतून एकदा पाणी मिळत असेल तर, येत्या उन्हाळ्यात येथील नागरिकांना पाण्यासाठी काही किलोमीटर वणवण करावी लागण्याच्या भीतीने ग्रामस्थ चिंतेत आहेत.

काटई येथे जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया

■डोंबिवली। प्रतिनिधी,

कल्याण शिळफाटा रस्त्यावरील काटई गाव हद्दीत गुरुवारी रात्री एमआयडीसीची जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले. जलवाहिनीतील पाणी रस्त्यावर आल्याने सुमारे अर्धा ते एक तास शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.एमआयडीसीची जलवाहिनी फुटण्याची या वर्षातील ही पहिलीच घटना आहे. मागील वर्षी सहा वेळा एमआयडीसीची जलवाहिनी फुटली होती. गुरुवारी रात्री काटई गावातील दुर्गा माता मंदिरासमोरील एमआयडीसी ची जलवाहिनी अचानक वॉल जवळ फुटली. अति उच्च दाबाने जलवाहिनीतून पाणी बाहेर येऊ लागल्याने जलवाहिनी शेजारील रहिवासी घाबरले. काही रहिवाशांच्या घरात जलवाहिनीचे पाणी घुसले. शिळफाटा रस्त्यावरील दुतफार्ची वाहतूक ठप्प झाली. जलवाहिनीच्या वरील भागातून उच्च दाबाच्या वीज वाहिन्या गेल्याने पाण्याचा संपर्क येऊन धोका निर्माण होण्याची भीती निर्माण झाली होती. स्थानिक रहिवाशांनी तातडीने एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना कळवले. एमआयडीसीचे अभियंते आणि दुरुस्ती पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जलवाहिनीचा बारवी धरणाकडून येणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला. जलवाहिनीतील आणि रस्त्यावरील पाणी ओसरल्यानंतर अभियंत्यांनी दुरुस्तीचे काम सुरू केले.

प्रियसीचा खून करणाऱ्या प्रियकराच्या मृतदेहावर महिन्याभरानंतर हत्येचा गुन्हा दाखल



■पनवेल। प्रतिनिधी,

कळंबोलीतील प्रियकराने प्रियसीची हत्या केल्यानंतर केलेल्या आत्महत्या प्रकरणातील अनेक कंगोरे महिन्याभरानंतर उजेडात येत आहेत. १२ डिसेंबरला प्रियकराचा मृतदेह नेरुळ जुईनगरच्या रेल्वेरुळावर सापडला. मात्र महिन्याभरात खारघरच्या डोंगररांगात प्रियसीचा मृतदेह सापडू शकला नाही. मात्र तीन दिवसांपूर्वी मृतावस्थेत १९ वर्षीय वैष्णवी हीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडल्यानंतर कळंबोली पोलीसांनी कायद्याच्या चौकटीत राहून वैष्णवी हीची मृत प्रियकर वैभव बुरुंगले याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणात बेपत्ता वैष्णवीचा मृतदेह पोलीसांना शोधायला लागलेला विलंब हा आधुनिक पोलीसांच्या तपास यंत्रणेविषयी साशंकता निर्माण करणारा ठरला आहे. कळंबोलीतील दुहेरी हत्याकांडाच्या गंभीर प्रकरणाने अनेक प्रश्न नवी मुंबई पोलीसांच्या तपास यंत्रणेविषयी उभे केले आहेत. हत्या झालेल्या वैष्णवीचा मृतदेह शोधण्यासाठी इतके दिवस का लागले. नवी मुंबई पोलीसांच्या विशेष पथकाची स्थापना केली नसती तर अजून काही महिन्यात वैष्णवीचा मृतदेह त्याच ठिकाणी जमिनदोस्त होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. स्थानिक कळंबोली पोलीस ठाण्यात मृत वैष्णवी हीच्या वडीलांनी दोन दिवसांपूर्वी दिलेल्या फीयार्दीमध्ये ते स्वता कळंबोलीतील एका शाळेच्या बसवर चालक म्हणून काम करतात. एक १३ वर्षांचा मुलगा आणि मुलगी वैष्णवीसह पत्नी असे हे कुटूंबिय सेक्टर ३ येथील एलआयजी येथे भाड्याच्या घरात राहतात. वैष्णवी ही सुधागड महाविद्यालयात शिकत असताना तीचे वैभव बुरुंगले याच्यासोबत प्रेम झाले. वैष्णवी ही त्यानंतर बीएसस्सी डेटा सायन्स या पुढील शिक्षणासाठी मुंबई (शीव) एसआयएस महाविद्यालयात पहिल्या वर्षात शिकत होती. ऑक्टोबर महिन्यात वैभव आणि वैष्णवी यांच्यातील प्रेम असल्याची बातमी वैष्णवी हीच्या पालकांना समजल्यावर त्यांनी काही नातेवाईकांसह वैभव याच्या घरी जाऊन त्याच्या पालकांची भेट घेतली. वैभव हा कळंबोलीतील सेक्टर १६ येथील हंसध्वनी या सोसायटीत राहत होता. यापुढे वैष्णवी हीच्यासोबत कोणतेही संबंध ठेऊ नये अशी समज वैभवला दिल्यापासून वैष्णवी हीने कुटूंबियांचे ऐकत वैभवशी भेटणे सोडले. १२ डिसेंबरला वैष्णवी हीने वडिलांना फोनकरुन दुपारी सव्वादोन वाजता महाविद्यालय सूटले असून घरी येत असल्याचे सांगीतले.

उल्हासनगरमधील भाजप नेत्यांच्या हत्येचा कट, कटात गोवण्याचा प्रयत्न असल्याचा भाजप जिल्हाध्यक्षांचा आरोप

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

उल्हासनगर शहरातील भाजपच्या माजी जिल्ह्याध्यक्षासह इतर दोन लोकप्रतिनिधींच्या हत्येचा कट आखल्याबाबतचे पत्र विद्यमान जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी उल्हासनगर पोलिस उपायुक्तांना दिले आहे. या हत्या मी घडवून आणणार असल्याचा कट आखत यात मला गोवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही रामचंदानी यांनी केला आहे. भाजपाचे वादग्रस्त माजी नगरसेवक आणि उल्हासनगरचे विद्यमान जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी उल्हासनगर पोलिस उपायुक्त यांना एक पत्र पाठवले. मला मिळालेल्या माहितीनुसार एका अज्ञात व्यक्तीस २५ लाख रुपयांची सुपारी देऊन उल्हासनगरमधील भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष जमनू पुरस्वानी, महेश सुखरामनी आणि अमित वाधवा यांच्यावर गोळीबार करण्यात येणार आहे, असे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. हा हल्ला माज्या सांगण्यावरून करण्यात आला अशी खोटी साक्ष अज्ञात व्यक्ती पोलिस ठाण्यात देणार असल्याचेही त्यांनी यात म्हटले आहे. रामचंदानी यांच्या पत्राने शहरातील राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली. या प्रकरणी सर्वांची नार्को चाचणी करण्यात यावी. यानंतर सत्य समोर येईल. केवळ पोलिस संरक्षण मिळवण्यासाठी हा सर्व प्रकार होत आहे, अशी प्रतिक्रिया अमित वाधवा यांनी दिली. तर याबाबत मी आमदार कुमार आयलानी यांच्यासोबत पोलिस उपायुक्त सुधाकर पठारे यांची भेट घेत तात्काळ योगत तो तपास करण्याची मागणी केली असल्याचे जमनू पूरस्वानी यांनी म्हटले आहे.

उल्हासनगरच्या पाणी पुरवठा योजनेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन भूमीपूजन

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

महापालिकेच्या पाणी पुरवठा वितरण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे भूमीपूजन शुक्रवारी सकाळी ११ वाजता गोलमैदान योगाकेंद्र येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन झाले. यावेळी आमदार कुमार आयलानी, महापालिका आयुक्त अजीज शेख यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. उल्हासनगर महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत ४०० कोटींची पाणी पुरवठा वितरण योजना राबविली असून जुन्या जलवाहिनीच्या जागी नवीन जवाहिन्या टाकून १ भूमिगत जलकुंभासह ११ उंच जलकुंभ उभारण्यात आले. तसेच ५५ हजार पाणी मिटरसह पंपिंग स्टेशन उभारले. मात्र झोपडपट्टी परिसरात जलवाहिन्या टाकण्यात न आल्याने, योजना अपूर्ण राहिली होती. योजना पूर्ण करण्यासाठी महापालिकेने केंद्राकडे पाठपुरावा केल्यावर केंद्राच्या अमृत योजने अंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील २२६ कोटीच्या योजनेला मंजूर मिळाली. त्या योजनेचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी ऑनलाईन झाले.

दुसऱ्या टप्प्यातील २२६ कोटीच्या पुरवठा वितरण योजने अंतर्गत जुन्या जलवाहिनीच्या ठिकाणी नवीन जलवाहिनी टाकणे, ४ नवीन जलकुंभ उभारणे, घरोघरी पाणी मीटर जोडणी आदी कामे केली जाणार असल्याची माहिती भूमिपूजन झाल्यानंतर महापालिका आयुक्त अजीज शेख यांनी दिली. दुसऱ्या टप्प्यातील योजना पूर्ण झाल्यावर शहरातील पाणी टंचाई निकाली निघणार असल्याची माहिती आयुक्त शेख यांनी दिली आहे. महापालिकेच्या पाणी पुरवठा वितरण योजनेच्या भूमिपूजन कार्यक्रमाला आमदार कुमार आयलानी महापालिका आयुक्त अजीज शेख.

पोखरण रोड भागातील हजारो लघु उद्योजकांना दिलासा; नवे रोहित्र आणि विद्युत वाहिन्याही भूमिगत

■ठाणे। प्रतिनिधी,

गेल्या अनेक वर्षांपासून विद्युत पुरवठा खंडीत होऊन पोखरण रोड येथील लघु उद्योजकांना मोठा फटका बसत होता. अखेर विद्युत पुरवठ्याबाबत लघु उद्योजकांची चिंता मिटली आहे. महावितरण कंपनीने येथील उच्च आणि लघु दाब वाहिन्या भूमिगत केल्या असून नव्याने रोहित्र बसविले आहे. तसेच उद्योगासाठी स्वतंत्र विद्युत वाहिन्या उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता येथील उद्योजकांना त्यांचा व्यवसाय विना अडथळा करणे शक्य होणार आहे.

पोखरण रोड येथील उपवन भागात १ हजार २०० लघु उद्योजकांचे कारखाने आहेत. दरवर्षी येथील लघु उद्योगांमधून १०० कोटी रुपयांची उलाढाल होत असते. यातील बहुतांश कारखाने अभियांत्रिकी स्वरूपातील आहे. तसेच १० ते १५ हजार कामगार, मजूरांना याठिकाणी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या रोजगार उपलब्ध होतो. काही लघु उद्योगांमधून मोठ्या कंपन्यांनाही यंत्र उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे येथील कारखाने अत्यंत महत्त्वाचे आहे. असे असले तरी येथील उद्योजकांना विद्युत पुरवठा खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. येथील विद्युत वाहिन्या ओव्हरहेड स्वरूपात होत्या.

त्यामुळे पावसाळ्यात विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढत होते. तसेच ज्या रोहित्रामधून येऊर भागातील रहिवाशांना विद्युत पुरवठा होतो. त्याच रोहित्रामधून येथील कारखान्यांनाही विद्युत पुरवठा केला जात होता. त्यामुळे अनेकदा विद्युत वाहिनींवर दाब येत होता. यासंदर्भात येथील पोखरण लेक स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन या लघु उद्योजकांच्या संघटनेने जिल्हा उद्योग केंद्र तसेच महावितरणकडे वारंवार पाठपुरावा केला होता.

अयोध्देतील राममंदीराच्या प्राणपतिष्ठा सोहळ्यात निवड झाली या बातमीनेच घरात दिवाळी साजरी झाली

■पनवेल। प्रतिनिधी,

२२ जानेवारीला अयोद्धा येथे होत असलेल्या प्रभु रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात देशभरातील ११ जोडप्यांना विशेष निमंत्रित केले आहे. यामध्ये खारघर वसाहतीमधील विठ्ठल आणि त्यांची पत्नी उज्वला कांबळे यांचाही समावेश आहे. कांबळे यांच्याशी बातचित केल्यावर त्यांनी ३ जानेवारीला अयोद्धा येथे होत असलेल्या सोहळ्याचे निमंत्रण मिळाल्यानंतर घरात दिवाळी साजरी होत असल्याची भावना प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. अयोध्येतील राम मंदिर लोकार्पण सोहळ्याची तयारी शेवटच्या टप्यात आहे. अयोद्धयाचे नव्हेतर देशभरातील विविध उपनगरांमधील बाजारपेठा राममय झाल्या आहेत. भाजपतर्फे विविध उपनगरांमध्ये नमो चषकचे क्रीकेट सामने भरुन युवांना एकत्रित केले जात आहे. मंदीर न्यासाच्या कार्यक्रमात देशातून नव्हेतर परदेशातून जोरदार तयारी सूरु असून अनेक मान्यवर वेळात वेळ काढून रामांचे दर्शनासाठी नियोजन करत आहे. या दरम्यान ३ जानेवारीला अयोद्धा येथील मंदीरात राममुर्तीची प्राणप्रतिष्ठा होत असताना ११ विशेष जोडप्यांना बोलावण्यात येत आहे. यामध्ये नवी मुंबईतील खारघर येथे राहणारे विठ्ठल कांबळे यांनी त्यांच्या भावना व्यक्त करताना ३ जानेवारीला निमंत्रणाचा फोन आल्यावर कांबळे कुटूंबियांचे आनंदाश्रु अनावर झाल्याचे त्यांनी सांगीतले.

'अयोध्येतील श्री राम मंदिराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राजीव गांधींनी प्रयत्न केले

■नागपूर। प्रतिनिधी,
अयोध्येतील राम मंदिरावरुन काँग्रेसवर केली जात असलेली टीका चुकीची आहे. पंतप्रधान राजीव गांधी यांनीच अयोध्येतील श्रीराम मंदिराचे दरवाचे उघडून श्रीराम दर्शनाची व्यवस्था केली व शिलान्यासही त्यांच्याच काळात झाला. राम मंदिराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठीही राजीव गांधी यांनी प्रयत्न केले पण राजीव गांधींच्या प्रस्तावाला भाजपने त्यावेळी विरोध केला होता, मग आता मंदीर कुठे बांधत आहेत, असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला. नागपुर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले की, महाराष्ट्र हे छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे राज्य आहे. जेव्हा जेव्हा लोकशाही, संविधान संपवण्याचा प्रयत्न झाला तेव्हा या महाराष्ट्राने लोकशाही आणि संविधान मानणाऱ्यांना ताकद दिली. जातीच्या व धर्माच्या नावाने राजकारण करणारा भाजप संविधान व्यवस्था संपवू पाहत असताना महाराष्ट्रातील जनतेने आज पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले व आंबेडकरांच्या विचाराला ताकद देण्याचा संकल्प केलेला आहे. महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचा मोठा पराभव स्पष्ट दिसत आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वारंवार महाराष्ट्रात प्रचाराला यावे लागत आहे.

सोलापुरातील विडी घरकुल योजना ही डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारची आहे, या योजनेच्या चाव्या द्यायला पंतप्रधान नरेंद्र मोदी आले आहेत. चाव्या देणे एवढीच मोदी गॅरंटी आहे. युपीए सरकारच्या काळातील ही योजना पूर्ण करण्यास मोदी सरकारला १० वर्षे लागली. विडी घरकुलबदद्ल मोदींची गॅरंटी म्हणजे ह्यखोटं बोल पण रेटून बोलह्न अशी आहे. नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत, त्यांनी असे खोटे बोलू नये. परवाच मुंबईतील सागरी सेतूच्या उद्घाटनाला पंतप्रधान मोदी आले होते. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान कमी व प्रचारप्रमुख जास्त वाटतात, असा टोलाही पटोले यांनी लगावला.

राहुल गांधी यांना अटक करु, असे आसामचे मुख्यमंत्री म्हणत आहेत, त्यावर प्रतिक्रिया देताना नाना पटोले म्हणाले,ते हुकूमशाहीवृत्तीचे लोक आहेत ते असेच बोलणार. राहुल गांधींना भाजप घाबरते त्यातूनच कारवाईची धमकी दिली आहे.

बाशी बेहनवाल टोळीवर मोक्का

■नाशिक। प्रतिनिधी,
लूटमार, प्राणघातक हल्ला असे आरोप असणाऱ्या बाशी उर्फ शिवम बेहनवाल टोळीवर शहर पोलिसांनी केलेल्या मोक्का कारवाईस अप्पर पोलीस महासंचालकांनी शिक्कामोर्तब केले आहे. या टोळीविरोधात मोक्का न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याचे आदेश अप्पर महासंचालकांनी दिले आहेत.

बाशी उर्फ शिवम उर्फ शुभम बेहनवाल (२३, रा.फर्नांडिसवाडी, जयभवानी रोड), नेम्या उर्फ रोशन पवार (रा.निलगिरीबाग,औरंगाबाद रोड), अमन वर्मा (रा.वंदे मातरम अपार्टमेंट, औटेमळा), भैयू उर्फ सत्यम ढेनवाल (रा.एकलहरारोड,हनुमाननगर), रोहन राठोड उर्फ पियूष खोडे, सुधांशू उर्फ सोनू बेद (रा. दोंघे फर्नांडिसवाडी, नाशिकरोड), मोहिज शेख (रा. विठ्ठल मंदिराजवळ, विहितगाव), बिडी उर्फ गौरव मुकणे (रा. देवळाली कॅम्प), चिक्या उर्फ मितेश परदेशी (रा.देवळाली कॅम्प), शाहिद सय्यद (रा. पाटील गॅरेज मागे, देवळाली गाव) आणि भावेश उर्फ गौरव आव्हाड (रा. देवळालीगाव) अशी मोक्कान्वये कारवाई करण्यात आलेल्या बाशी बेहनवाल टोळीतील सदस्यांची नावे आहेत.

बाशी बेहनवाल टोळीची नाशिकरोडसह,जेलरोड,जयभवानीरोड आणि देवळाली गाव परिसरात मोठी दहशत आहे. खून, खूनाचा प्रयत्न, लूट असे गुन्हे करून या टोळीने परिसरात मोठी दहशत माजवली. २४ जुलै रोजी एकास जीवे मारण्याची धमकी देत या टोळीने लुटमार केली होती. या घटनेत खिशातील रोकड बळजबरीने काढून घेत या टोळीने सदर व्यक्तीच्या डोक्यात धारदार शस्त्राने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. तसेच परिसरातील वाहनांची तोडफोड केली होती. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात जबरी लुटीसह प्राणघातक हल्ला व विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या टोळीतील सदस्यांना अटक केल्यावर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली.

शिवशाही बसच्या धडकेत ज्येष्ठ महिलेचा मृत्यू

■पुणे। प्रतिनिधी,
शिवशाही बसच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची घटना स्वारगेट परिसरातील देशभक्त जेधे चौकात घडली. याप्रकरणी बसचालकाविरुद्ध स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

कस्तुरीबाई रतनलाल राठोड (वय ७५) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी शिवशाही बसचालक करण प्रकाश बहादुर (वय ३२,रा. गार्निश बिल्डींग, आंबेगाव पठार, धनकवडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राठोड यांची नात सोनाली रवींद्र पुजारी (वय ३३, रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

राठोड स्वारगेट येथील देशभक्त केशवराव जेधे चौकातून निघाल्या होत्या. त्यावेळी रस्ता ओलांडणाऱ्या राठोड यांनी शिवशाही बसने धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या राठोड यांचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला होता. पोलीस उपनिरीक्षक जगताप तपास करत आहेत.

पुण्याच्या खराब हवेचा केंद्रीय मंत्र्यांना फटका

■पुणे। प्रतिनिधी,
गेल्या काही दिवसांत किमान तापमानात घट झाल्याने पुणे आणि परिसरात गारवा वाढला आहे. गुलाबी थंडीमुळे वातावरण आल्हाददायक झाले असले, तरी हवेमध्ये प्रदूषणकारी धुलिकणांचे प्रमाण वाढल्याने हवेची गुणवत्ता खालावल्याचे दिसून येत आहे. त्याचा फटका पुणे दौऱ्यावर आलेल्या चक्क केंद्रीय मंत्र्यांना बसला आहे. हे मंत्री पुण्यात आल्यानंतर आजारी पडले असून त्याला प्रशासनाकडूनही दुजोरा देण्यात आला आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल राज्यमंत्री अश्विनीकुमार चौबे हे बुधवारपासून पुणे दौऱ्यावर आले आहेत. बुधवारी त्यांनी शहरातील धनकवडी परिसरात भारत संकल्प यात्रा अंतर्गत कार्यक्रमात भाग घेतला होता. तसेच गुरुवारी भारत संकल्प यात्रा अंतर्गत वडगाव शेरी भागातील कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. शुक्रवारी सकाळी सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यान येथे महापालिकेच्या समाजविकास विभागामार्फत आयोजित खाद्यमहोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात येणार होते.

पुणे : गेल्या काही दिवसांत किमान तापमानात घट झाल्याने पुणे आणि परिसरात गारवा वाढला आहे. गुलाबी थंडीमुळे वातावरण आल्हाददायक झाले असले, तरी हवेमध्ये प्रदूषणकारी धुलिकणांचे प्रमाण वाढल्याने हवेची गुणवत्ता खालावल्याचे दिसून येत आहे. त्याचा फटका पुणे दौऱ्यावर आलेल्या चक्क केंद्रीय मंत्र्यांना बसला आहे. हे मंत्री पुण्यात आल्यानंतर आजारी पडले असून त्याला प्रशासनाकडूनही दुजोरा देण्यात आला आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल राज्यमंत्री अश्विनीकुमार चौबे हे बुधवारपासून पुणे दौऱ्यावर आले आहेत. बुधवारी त्यांनी शहरातील धनकवडी परिसरात भारत संकल्प यात्रा अंतर्गत कार्यक्रमात भाग घेतला होता. तसेच गुरुवारी भारत संकल्प यात्रा अंतर्गत वडगाव शेरी भागातील कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. शुक्रवारी सकाळी सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यान येथे महापालिकेच्या समाजविकास विभागामार्फत आयोजित खाद्यमहोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात येणार होते.

भामट्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तक्रारदार महिलेने जवळील दोन लाख 66 हजाराचा सोन्याचा ऐवज पिशवीत गुंडाळला. हा ऐवज कुणी चोरू नये म्हणून भामट्यांनी स्वतःजवळ घेतला. आपणास रामाचे दर्शन होत आहे या आनंदात महिला होती.

नवऱ्याचा पाठिंबा, कुटुंबाची साथ; 'एमपीएससी' त मुलींमध्ये पूजा वंजारी राज्यात अव्वल

■पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी,
एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षेमध्ये राज्यात मुलींमध्ये पिंपरी- चिंचवडची पूजा वंजारी अव्वल आली आहे. संसार आणि अभ्यास अशी कसरत करून तिने हे यश संपादन केल्याने तिचे विशेष कौतुक होत आहे. पूजाला तिच्या पतीचा पाठिंबा मिळाला. एक वेळ स्वयंपाक राहू दे मात्र अभ्यास कर, असं तिच्या पतीने ठणकावून तिला सांगितलं. स्पर्धा परीक्षेसाठी पती खंबीरपणे पाठीशी उभे राहिले, असं पूजाने लोकसत्ता ऑनलाइनशी बोलताना सांगितले. ९०० पैकी ५७०.२५ गुण मिळवत पूजा राज्यात मुलींमध्ये अव्वल आली आहे. शैक्षणिक आणि शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या पूजाला आपण अधिकारी होऊ शकतो असा विश्वास आधीपासूनच होता. तो खऱ्या अर्थाने एमपीएससी उत्तीर्ण करत तिने सत्यात उतरवला आहे. आठव्या वेळी ती यश संपादन करू शकली.पुढे ती म्हणाली, एमपीएससीमध्ये यशापेक्षा अपयश जास्त बघावं लागतं हे तितकंच खरं आहे. ते माज्या बाबतीत खरंही ठरलं. कोविड काळात स्पर्धा परीक्षा पुढे ढकलल्या गेल्या. यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागला. या यशात कुटुंबाचा मोठा वाटा आहे. माझं लग्न झालेलं आहे. लग्नानंतर अनेक गोष्टी बदलतात. अनेक मुली लग्नानंतर शिक्षणाबाबतची स्वप्न तिथेच सोडून देतात. माज्या बाबतीत मात्र पतीचे खूप सहकार्य मला मिळाले. माझे पती खंबीरपणे पाठीशी उभे राहिले. घरात एक वेळ स्वयंपाक करू नकोस पण अभ्यास कर, असं पती नेहमी म्हणायचे असं पूजा म्हणाली.

विद्येच्या माहेरघरात अघोरी प्रकार; मुलाला मानसिक आजारातून मुक्त करतो असे सांगत लुटले

■पुणे। प्रतिनिधी,
विद्येच्या माहेरघरात धक्कादायक अघोरी प्रकार पुन्हा घडला आहे. मुलाचा मानसिक आजारातून मुक्त करण्यासाठी फियार्दीकडून वेळो वेळी तब्बल ३५ लाख रुपये लुटले आहेत, हा सगळा प्रकार २०१६ पासून ते आतपर्यंत घडत आला आहे. मात्र मुलावर करण्यात आलेल्या अघोरी कृत्याचा काही परिणाम पडला नाही म्हणून पुन्हा ५० लाख रुपयेचा खर्च आणि एक नरबळी द्यावी लागेल, असे सांगितले या जाचाला कंटाळून फियार्दी यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

चंदननगर पोलिसांनी फियार्दीने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी चारुदत्ता संजय मारणे (वय ३१ रा. बिपाणी वस्ती आंबेगाव पुणे) पूनम घनश्याम कोहांडे (वय ३८) नीलम राहुल जाधव (वय ३५) देविका अमित जुन्नलकर (वय ३० रा. उत्सव वेल्डिंग पुणे), संतोष मारुती येणपुरे (वय ४५) असं सगळ्या आरोपींची नाव आहेत.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी आहे की, फियार्दी यांचा मुलगा वेदांत रविंद्र गायकवाड हा जन्मापासून मानसिकरित्या दुर्बल आणि आजारी आहे. तसेच घरात ही इतर आडी अडचणी पण खूप आहेत. ही गोष्ट आरोपी यांना समजल्यावर त्यांनी फियार्दीचा विश्वास संपादन करून अघोरी विद्या व जादूटोणा प्रयोग करून मुलाला आजर मुक्त करू असे खोटे आश्वासन देऊन फियार्दी यांच्याकडून वारंवार पैसे घेत तब्बल ३५ लाख रुपये घेतले. तसेच अजून ५० लाख आणि एक नरबळी द्यावा लागेल नाही तर मुलाचा आणि पतीचा मृत्यू होईल, असे खोत सांगितले.

अधिकृत कंपनीव्यतिरिक्त अन्य ज्ञात-अज्ञात कंपन्यांना पॅनकार्ड सेवा देण्यास मज्जाव

■मुंबई। प्रतिनिधी,
सरकारी मालकीच्या यूटीआय इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी अँड सर्व्हिसेस लिमिटेडच्या (यूटीआय आयटीएसएल) वतीने पॅनकार्ड सेवा प्रदान करत असल्याचा दावा करणाऱ्या संकेतस्थळांना ही सेवा देण्यापासून उच्च न्यायालयाने मज्जाव केला आहे. या संकेतस्थळांकडून दिली जाणारी सेवा बेकायदा असून त्यांची ही कृती राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात घालणारी आहे, अशी टिप्पणी न्यायालयाने

या प्रकरणी एकतर्फी आदेश देताना केली. भारत सरकारने पॅनकार्ड आधार कार्डशी संलग्न करणे अनिवार्य केले आहे. पॅनकार्ड हा नागरिकत्वाची ओळख पटवणारा स्वीकारार्ह पुरावा मानला जातो. त्यामुळे, त्याचा कोणाकडूनही संभाव्य गैरवापर होऊ शकतो आणि ते केवळ कंपनीच नाही, तर देशाच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकते. म्हणून, या प्रकरणी प्रतिवादींनी नोटीस न बजावता पॅनकार्ड सेवा प्रदान करण्यास मज्जाव करणारा एकतर्फी आदेश देणे आवश्यक आहे, असे न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या एकलपीठाने प्रामुख्याने नमूद केले.

रेल्वेने प्रवास करताना सतर्क राहा, चोरीच्या घटनांमध्ये दुपटीने वाढ

■नागपूर। प्रतिनिधी,
रेल्वे प्रवासादरम्यान प्रवासी आणि त्यांच्या वस्तू सुरक्षित नसल्याचे रेल्वेत होणाऱ्या चोरीच्या घटनांच्या आकेडवारीवरून दिसून येते . तीन वर्षांत धावत्या रेल्वेत चोरीच्या घटनांमध्ये तब्बल दुपटीने वाढ झाली आहे.रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्या तुलनेत रेल्वेगाड्यांची आणि रेल्वे सुरक्षा दलातील जवानांची संख्या वाढताना दिसत नाही. त्याचा परिणाम रेल्वेच्या आरक्षित डब्यात प्रवाशांच्या वस्तू चोरी होण्याचे प्रमाण वर्षागणिक वाढत आहे. २०२१ मध्ये ६८२ चोरीच्या घटना घडल्या होत्या. पुढल्या वर्षी ११६० घटना घडल्या आणि ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत १३२४ चोरीच्या घटनांची नोंद करण्यात आली आहे, असा तपशील माहिती अधिकारात अभय कोलारकर यांना प्राप्त झाला आहे. नागपूरमार्गे धावणारी पुणे ते हटिया एक्सप्रेसमध्ये अलीकडे तृतीयपंथीयांनी रात्री प्रवाशांना लुटण्याची घटना घडली. त्याबाबत भारतीय यात्री केंद्राने रेल्वे मंत्रालयाला पत्र लिहून प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

याबाबत या केंद्राचे अध्यक्ष बसंतकुमार शुक्ला म्हणाले, रेल्वेत तिकीट तपासणींची पदे रिक्त आहेत. रेल्वे सुरक्षा दलाचे नागपूर विभागातील दोन हजार पदे रिक्त आहेत. रेल्वेगाडी २१ ते २५ डब्यांची असते. साधारणतः एका टीटीई तीन-चार डब्यांमध्ये तिकीट तपासणी करीत असतात.

महालक्ष्मी रेसकोर्सवर कोणतेही बांधकाम नाही, महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांची सदस्यांना ग्वाही

■मुंबई। प्रतिनिधी,
महालक्ष्मी रेसकोर्सवर कोणतेही बांधकाम करण्यात येणार नाही, याठिकाणी उद्यान आणि हिरवळ तशीच राहील, अशी ग्वाही पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी दिली आहे. रेसकोर्स व्यवस्थापनाच्या खुल्या आमसभेत त्यांनी सदस्यांच्या उपस्थितीत ही ग्वाही दिली. तसेच या प्रस्तावात कोणत्याही बांधकाम व्यावसायिकाचा काहीही संबंध नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

महालक्ष्मी येथील रेसकोर्सच्या बहुचर्चित पुर्नविकास प्रस्तावाबाबत रेसकोर्सच्या व्यवस्थापनाला गुरुवारी झालेल्या खुल्या सभेत स्वतः पालिका आयुक्तांनी माहिती दिली. रेसकोर्सच्या भाडेकराराचे नूतनीकरण करण्यात येणार असून रेसकोर्सच्या २२६ एकर जागेपैकी १२० एकर जागा पालिकेला संकल्पना उद्यान (थीम पार्क) उभारण्यासाठी द्यावी याबाबतचा हा प्रस्ताव आहे. या प्रस्तावानुसार १२० एकर जागेवर उद्यान साकारले जाणार असून ते सागरी किनारा मार्गावरील उद्यानाला भूमिगत मार्गाने जोडले जाणार आहे.

पालिका आयुक्त चहल यांनी गुरुवारच्या सभेत आधी सादरीकरण केले व त्यानंतर सदस्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. संध्याकाळी सात वाजल्यापासून ते रात्री साडेआठ वाजेपर्यंत ही बैठक सुरू होती. महालक्ष्मी रेसकोर्स येथे पार पडलेल्या या बैठकीला पालिकेच्या संबंधित विभागाचे अधिकारी, तसेच रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब (आरडब्ल्यूआयटीसी) म्हणजेच रेसकोर्स व्यवस्थापनाचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. सदस्यांनी यावेळी मोठ्या प्रमाणावर प्रश्नांचा भडीमार केला. या सर्व प्रश्नाची आयुक्तांनी उत्तरे दिली. दरम्यान, रेसकोर्सचा भाडेकरार करण्यासाठी या प्रस्तावाला समर्थन करण्याची अट का घातली जात आहे, असा सवाल काही सदस्यांनी उपस्थित केला होता. तर थीम पार्क उभारताना हिरवळ कशी टिकवणार असेही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते.

कृषी विज्ञान केंद्राच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर कृषिक प्रदर्शन सुरू; मुका घेणारा बैल बनतोय चर्चेचा विषय

■बारामती। प्रतिनिधी,
येथील शारदानगर येथे सध्या एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्राच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर कृषिक प्रदर्शन सुरू आहे. भारतातील हे सर्वात मोठे शेतीची प्रात्यक्षिके असणारे प्रदर्शन म्हणून पाहिले जात आहे. यावर्षी या प्रदर्शनात पशुपक्ष्यांचे देखील प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये दौंड तालुक्यातील नंदादेवी येथील संतोष बापूराव कोकणे यांची सोन्या आणि मोन्या हे काजळी खिल्लार बैल सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. त्याला कारणही तसेच आहे हे बैल मालकाच्या सूचनेप्रमाणे चक्क मुका देतो. कोकणे यांनी सोन्या आणि मोन्या या जातीवंत बैलांची माणसाप्रमाणे निगा राखली आहे. नुकत्याच चालू बोलू लागलेल्या लहान बाळाला आपण जशा सूचना देतो आणि ते बाळ जसे त्याचे पालन करते, अगदी त्याचप्रमाणे हे बैल पाटावर उभा रहा म्हटले की पाटावर उभा राहतो. मुका घे म्हटले घेतात. माणसाप्रमाणे बसून असायचा. पुढे त्याची उंची वाढल्यानंतर त्याच्यासाठी गोठा तयार करण्यात आला. परंतु या दरम्यानच्या काळात तो लहान मुलांशी एवढा मिसळून गेला की, त्याचे हे वागणं बघून तो पप्पी देतोय, असे सगळ्यांना वाटू लागलं आणि साहजिकच त्याची सगळ्यांना सवय झाली. पूर्वी पप्पी दे पप्पी दे पारुला हे गाणं चर्चेत होतं आणि आता हे बैल सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. खरंतर मुका देणारा बैल म्हटल्यानंतर सगळीकडे चर्चा अशी होती की उपहासात्मक बोलले जात आहे. कारण कधी कधी नवऱ्याला देखील बैल म्हटले जाते, परंतु तसे नसून हा प्रत्यक्षात बैल आहे आणि तो मुका देतो.

डोंबिवलीत फडके रोडची पाणी मारून सफाई; राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

■डोंबिवली। प्रतिनिधी,
डोंबिवलीतील फडके रोडवर अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यानिमित्ताने फडके रोडची शुक्रवारी सकाळी टँकरद्वारे पाणी मारून सफाई करण्यात आली.तसेच या रस्त्यावरील फेरीवाल्यांचे पक्क्या बांधकामाचे मंच जेसीबीच्या साह्याने तोडून टाकण्यात आले.

फडके रोडवर सकाळीच टँकर मधून पाणी मारून स्वच्छता केली जात असताना नागरिक, व्यापारी आश्चर्यचकित होऊन पाहत होते. शहराच्या अनेक भागात नागरिकांना पिण्यास पाणी नाही, मात्र फडके रोडवर पाण्याची उधळपट्टी चालल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. अयोध्येतील राम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा दूरदृश्य प्रणाली द्वारे फडके रोडवरील आप्पा दातार चौकात नागरिकांना दाखवण्यात येणार आहे. यानिमित्ताने या रस्त्यावर स्वच्छता असावी या उद्देशाने ही सफाई करण्यात आली आहे. श्री गणेश मंदिर संस्थानच्या पुढाकाराने हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच पालिकेच्या फ प्रभागाकडून फडके रस्ता, चिमणी गल्ली, नेहरू रस्ता भागात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.अशाच प्रकारे पालिका अधिकाऱ्यांनी नियमित फडके रस्ता, चिमणी गल्ली, नेहरू रस्ता भागातील फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कल्याणमध्ये श्रीराम दर्शनाचे निमित्य करून महिलेची अडीच लाखाची फसवणूक

■डोंबिवली। प्रतिनिधी,
आम्ही तुम्हाला श्रीरामाचे दर्शन घडवून आणतो, असे एका जेष्ठ नागरिक महिलेला सांगून तीन भामट्यांनी ज्येष्ठाची बुधवारी फसवणूक केली आहे.कल्याण पश्चिम येथील खडकपाडा भागातील लोटस डेंटल केअर सेंटर येथेही फसवणुकीची घटना घडली आहे.

तक्रारदार महिला बुधवारी दुपारी खडकपाडा भागातून पायी चालल्या होत्या . यावेळी त्यांना तीन भामट्यांनी अडवले. आम्ही राम भक्त आहोत. आम्ही तुम्हाला प्रभू रामचंद्रांचे दर्शन घडवून आणतो. यासाठी तुम्ही तुमच्या हातातील सोन्याच्या बांगड्या, इतर सोन्याचा ऐवज पिशवीत गुंडाळून ठेवा, असे भामट्यांनी महिलेला सांगितले.

भामट्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तक्रारदार महिलेने जवळील दोन लाख 66 हजाराचा सोन्याचा ऐवज पिशवीत गुंडाळला. हा ऐवज कुणी चोरू नये म्हणून भामट्यांनी स्वतःजवळ घेतला. आपणास रामाचे दर्शन होत आहे या आनंदात महिला होती. तेवढ्यात तिन्ही भामट्यांनी महिलेला एकाएकी सोडून तिथून पळ काढला.

देशभरातील पन्नास टक्क्यांहून अधिक प्राथमिक शिक्षकांकडे किमान पात्रतेचा अभाव

■मुंबई। प्रतिनिधी,
देशभरातील प्राथमिक शिक्षकांपैकी पन्नास टक्क्यांहून अधिक शिक्षक हे शिक्षणशास्त्र पदविका, पदवी असे किमान पात्रता निकष पूर्ण करणारे नाहीत, तर बहुसंख्य शाळांमध्ये गणित, विज्ञान आणि इंग्रजी अध्यापनासाठी त्या विषयांतील पदवीधर शिक्षक नसल्याचे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने केलेल्या अभ्यासातून उघड झाले आहे.

असरच्या अहवालातून नुकतेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अधोगतीचे दाखले मिळाल्यानंतर आता देशभरातील शाळांमधील शिक्षकांची स्थितीही फारशी बरी नसल्याचे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या सेंटर फॉर एक्सलन्स इन टीचर्स एज्युकेशनने केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षांतून दिसते आहे. देशभरातील प्राथमिक शिक्षकांपैकी अवघे ४६ टक्के शिक्षक हे शिक्षणशास्त्रातील पदविकाधारक (डीएड), किंवा पदवीधारक (बीएड) आहेत. खासगी शाळांमध्ये अपात्र शिक्षकांची संख्या तुलनेने अधिक आहे. पदवीचे शिक्षण ज्या विषयात घेतले आहे त्याच विषयाचे अध्यापन करण्याची संधी ६८ ते ७० टक्के शिक्षकांना मिळाली असली तरी गणित, विज्ञान, इंग्रजी विषय शिकवण्यासाठी शिक्षकांची कमतरता आहे.

त्यामुळे शिक्षण गणित विज्ञान किंवा इंग्रजी विषय शिकवण्यासाठी पदवीचे शिक्षण या विषयांतील नसलेल्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे विषय शिकवणाऱ्या शिक्षकांपैकी ३५ ते ४० टक्के शिक्षकांची पदवी गणित, विज्ञान किंवा इंग्रजी विषयांतील नाही.